२९५४

# सर्वोदयाचें घोषणापत्र

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
वि ..........
ता. दि. ..........

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १०३८

★

विनोबा

REFBK-0008186

ग्राम सेवा मंडळ, नालवाडी
वर्धा (म. प्र.)

# आमचें प्रकाशित वाङ्मय

| | लेखक | रु. आ. |
|---|---|---|
| १ मधुकर | विनोबा | १–८ |
| २ जीवन-दृष्टि | ,, | १-१२ |
| ३ सर्वोदय-विचार | ,, | १–४ |
| ४ क्रांत-दर्शन | ,, | १–४ |
| ५ सिंहावलोकन | ,, | १–२ |
| ६ गीताअी (ठळक) | ,, | ०–८ |
| ७ ,, (लोक नागरी) | ,, | ०–४ |
| ८ ,, | ,, | ०–३ |
| ९ गीता-प्रवचनें | ,, | १–० |
| १० गीताध्याय-संगति | ,, | दीड आणा |
| ११ स्थितप्रज्ञ-दर्शन | ,, | १–८ |
| १२ गीताअी शब्दार्थ कोष | ,, | ४–८ |
| १३ ,, ,, ,, पक्की बांधणी | ,, | ५–० |
| १४ उपनिषदांचा अभ्यास | ,, | २–० |
| १५ अीशावास्य वृत्ति | ,, | १–८ |
| १६ स्वराज्य-शास्त्र | ,, | ०–१२ |
| १७ ज्ञानदेवाचीं भजनें | ,, | १–८ |
| १८ नामदेवाचीं भजनें | ,, | ०–१२ |
| १९ अेकनाथाचीं भजनें | ,, | ०–१२ |
| २० संतांचा प्रसाद | ,, | १–० |
| २१ अेकनाथाचीं भजनें, प्रस्तावना खंड | ,, | ०–८ |
| २२ लोकनागरी लिपि | ,, | ०–५ |
| २३ राम-नाम | ,, | ०–८ |

# सर्वोदयाचें घोषणापत्र

★

REFBK-0008186

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९४८

ग्राम सेवा मंडळ, नालवाडी
वर्धा (म. प्र.)

प्रकाशक
भाऊ पानसे
मंत्री, ग्रामसेवामंडळ, नालवाडी, वर्धा.

★
★★

आवृत्ति २ री

प्रति ५०००— जानेवारी १९५४

किं. ०-४-०

★★
★

मुद्रक
ज. दे. पत्की, B.A.B.T.
पत्की प्रिंटिंग प्रेस, रामनगर, वर्धा.

# दोन शब्द

१९५३ सालचें सर्वोदय संमेलन चांडिल ( बिहार ) येथें भरलें होतें. त्या संमेलनांत पू० विनोबांनी सर्वोदय-समाजाचें ध्येय, धोरण आणि कार्यक्रम इतक्या सुस्पष्ट रीतीनें विशद केलें कीं अनेकांना तीं भाषणें " मॅनिफेस्टो " प्रमाणें वाटलीं. म्हणून या भाषणांस " सर्वोदयाचें घोषणा-पत्र " हें नांव दिलें आहे. या भाषणांतून भूमिदानाच्या व्यूह-रचनेचा हि उहापोह केला गेला आहे.

ता. ७-८ आणि ९ या तीन दिवसांचीं संमेलनांतील हीं भाषणें ध्वनिमुद्रित केलीं गेलीं होतीं. भाषणें मुळांत हिंदींतून दिलीं होतीं. त्यांचा हा अधिकृत मराठी अनुवाद आहे.

—प्रकाशक

# विषयानुक्रम

(१) प्रवचन पहिलें :- मौलिक कार्य-जनशक्तीचें आवाहन :- किशोरलाल भाईंचें स्मरण – सिंहावलोकन – जगाची चालू स्थिति – आमची विचित्र स्थिति – बुद्धि व हृदय यांचा झगडा – आमची दयनीय स्थिति – आपलें खरें कार्य – दंड शक्ति व लोकशक्तीचें स्वरूप – प्रेम शक्तीला आवाहन – आपली कार्यपद्धति – खादीकामांत सरकार कडून अपेक्षा – विचार शासन आणि कर्तृत्व-विभाजन – विचाराला प्रचाराची जोड – नियमबद्ध संघटनेंतील एक दोष – घरोघर पोहोंचण्याची जरूर – दुसरें साधन, कर्तृत्व-विभाजन – परमेश्वराचें कर्तृत्व विभाजन – सैन्य-बलाचा छेद कसा उडेल ? – योजना राष्ट्राची नको खेड्याची हवी – आमचें खरें भांडवल – सर्वोदय समाज – सर्व-सेवा-संघ – एकांगी कामानें शक्ति

निर्माण होत नाहीं — भूदानयज्ञ — संपत्ति-दान-यज्ञ — सूतांजलि — श्रमदान — आपण सगळें मानव — तिसरी शक्ति. ......पृष्ठ १ ते २६

(२) प्रवचन दुसरें :— दोन प्रश्न (१) सरकार व सर्वोदय-समाज (२) भूदान-यज्ञाची व्यूहरचना :— प्रास्ताविक — मुक्त-चिंतनाचा माझा स्वभाव — राजकीय पक्ष आणि आमची दृष्टि — सरकारच्या आणि आमच्या दृष्टींत च फरक — सहकार करण्यामागील आमची भूमिका — हेतुबद्दल शंका नको — मौलिक भेद — सरकारशी सहकार कसा व किती ? - पक्षभेद मिटविण्याचा उपाय : सर्वमान्य कार्यक्रम — सज्जना सज्जनांत सामना नको — भारतीय लोकसत्ता : पांचामुखी परमेश्वर — ज्यावर एक मत तोच क्रियेचा विषय असला पाहिजे — भूदान यज्ञाची व्यूहरचना — भूदान-यज्ञ-ईश्वराची प्रेरणा — भूदान-यज्ञाचा विकास उत्तर प्रदेशांतील अनुभव — चळवळ व्यापक करण्याबाबत विचार — भगवान बुद्धाची भूमिः बिहार — भूदानाची व्यूहरचना — सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज — बिहारमध्यें इतरांनीं हि वेळ द्यावा — बिहारपासून अपेक्षा — बिहारचा देशव्यापी प्रभाव.

......पृष्ठ २७ ते ४५

(३) प्रवचन तिसरें :— अंतर्निरीक्षण :— भूदान कार्यकर्त्यांचें अभिनंदन — आत्मपरीक्षण — साहित्याची आवश्यकता — नम्र बना — विचारांचें अध्ययन व चिंतन — भक्तिमार्गी लोकांपेक्षां चिंतनाची आपल्याला अधिक गरज — अहल्या-राम-न्याय — सत्यनिष्ठेचा व्यापक प्रभाव — विचारांत खोल जाणें अपरिहार्य — सर्वांगीण दृष्टि : सर्व-सेवा — अंतःकरण-पूर्वक ईश्वरावर भरंवसा — नीतिधर्माचें अविचल पालन. ''पृष्ठ ४६ ते ५८

—❀—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
क्रमांक 20243 वि: मि ....
क्रमांक 9036 नों: दि: 24.1.1956

# सर्वोदयाचें घोषणा-पत्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
क्र. 8986
शाखा (स्थळप्रत)

प्रवचन पहिलें

## मौलिक कार्य–जनशक्तीचें आवाहन

### किशोरलालभाईचें स्मरण

शरीर कांहींसें अशक्त आहे, अशा परिस्थितींत मी आज आपल्यासमोर उपस्थित आहे या बद्दल आपली क्षमा मागतों. माझें म्हणणें थोडक्यांत सांगावें अशी माझी इच्छा आहे. त्यापूर्वीं शंकरराव देवांच्याप्रमाणें मी हि पूज्य किशोरलालभाओींचें स्मरण करून च माझें भाषण सुरू करतों.

जें अेक महान कार्य ईश्वरानें आपल्यावर सोंपविलें आहे आणि ज्याची आपण ईश्वराला आणि जनतेला साक्षी ठेवून दीक्षा घेतली आहे, त्या भूमि-दानाच्या कामांत किशोरलालभाओी अत्यंत तन्मय झाले होते. ‘कर्मांत अकर्म व अकर्मांत हि कर्म असूं शकतें;’ ही जीवनाची खुबी आपल्याला गीतेनें सांगितली आहे. किशोरलालभाओी शरीरानें दुर्बळ होते. म्हणून ज्याला आपण स्थूल कर्म म्हणतों, तें ते फारसे करूं शकत नव्हते. ते चोवीस तास कांहींना कांहीं करीत च असत. तरी पण त्या कर्माचा स्थूल आकार विशेष मोठा दिसत नसे. परंतु त्यांनीं आम्हांला असें दाखवून दिलें आहे कीं, कर्म न करण्याच्या स्थितींत

हि केवढें महान कार्य होऊं शकतें ! ज्यांचें हृदय निर्मळ असतें, परमेश्वराच्या कृपेनें ज्यांचे राग-द्वेष धुवून गेले आहेत, अशा मनुष्याचें केवळ अस्तित्व च पुष्कळसें काम करीत असतें. असे जे थोडे लोक जगांत अवतरतात, त्यांमध्यें मी किशोरलालभाओंची गणना करतों. बापूंच्या मागें आम्हांला त्यांचा च आधार होता आणि आपल्या सहज सौजन्यानें आम्हांला ते सांभाळून घेत होते. इतकी शक्ति आपल्यापैकीं दुसऱ्या कोणामध्यें अजूनपर्यंत प्रगट झालेली नाहीं; म्हणून त्यांची उणीव आम्हांला जाणवत आहे, व जाणवत राहील. आपआपसांतला सद्भाव आणि सौहार्द यांनीं च आपण त्या उणिवेची भरपाई करूं शकूं. तसें सौहार्द, सौजन्य, सद्भाव आणि बंधुभाव आपल्यांत राहून ईश्वराचें कार्य आपल्या हातून सिद्ध होईल अशी मी आशा करतों.

### सिंहावलोकन

आपला अेक कार्यकर्त्यांचा समाज आहे. येथें संमेलनाला आलों म्हणजे थोडें बोलतों हि, पण हें बोलणें हि आमचें काम च असतें. तें कांहीं केवळ वक्तृत्व होऊं शकत नाहीं; कर्तृत्वाचा च तें अेक भाग असतें. असे जे आम्ही लोक अेकत्रित येतों ते वर्षभर जे काम आपण करतों, तें नारायणाला अर्पण करावें आणि पुढील वर्षाच्या कामाकरतां कांहीं पाथेय बरोबर न्यावें यासाठीं येतों. अशा प्रसंगीं कांहीं विचार विनियम—विचारांचीं देवाण घेवाण—आपण करीत असतों. आज आपण या दृष्टीनें आपल्या कामामागें जी भूमिका आहे ती पाहिली पाहिजे आणि आपल्या कामाचें हि संशोधन केलें पाहिजे. अशा रीतीनें कार्यपद्धति, कार्यक्रम व कार्यरचना या तिन्हींविषयीं आपण थोडा विचार केला पाहिजे.

### जगाची चालू स्थिति

आपण जगाच्या एखाद्या दूर कोपऱ्यांत हि काम करीत असलों, तरी

साऱ्या जगाकडे नजर टाकल्याशिवाय आमचें काम चालणार नाहीं; अशी आज जगाची स्थिति आहे. जगामध्यें ज्या शक्ति काम करून राहिल्या आहेत, जे नवे प्रवाह सुरू आहेत, कल्पना आणि भावनांचा जो संस्पर्श आणि संघर्ष होऊन राहिला आहे त्यांकडे लक्ष देऊन च, आपलें छोटसें पाऊल आपण टाकलें पाहिजे. योग्य दृष्टीविना केलेलें काम आंधळें होईल, या करितां जगाच्या परिस्थितीचा हि विचार करणें जरूर आहे. आज आपण पहात च आहों कीं, जगाची स्थिति किती अस्थिर आहे, अितकें च नाहीं तर बरीचशी स्फोटक हि आहे. अनेक संकटें समोर उभीं आहेत. कोणत्या वेळीं ज्वालामुखीचा स्फोट होईल हें सांगता येत नाहीं. हें निष्कारण भीषण चित्र मी रेखाटीत नाहीं, त्यामुळें भयभीत होण्याची माझी इच्छा नाहीं व आपल्याला हि मी भयभीत करूं इच्छीत नाहीं. परंतु जी स्थिति आहे तिच्याकडे मात्र लक्ष वेधूं इच्छितों. जगामध्यें कोणत्या वेळीं काय होईल हें आपण सांगू शकत नाहीं, अशी अस्थिर परिस्थिति जगामध्यें आज आहे.

## आमची विचित्र स्थिति

अेक दोन महिन्यापूर्वीची गोष्ट आहे. दिल्लीमध्यें कित्येक ज्ञानी, विद्वान लोक अेकत्र जमले होते आणि त्यांनीं अहिंसेच्या दर्शनासंबंधीं कांहीं चिंतन, मनन आणि विचार केला. त्यांत आपले पूज्य राजेन्द्रबाबू असें म्हणाले होते कीं, ‘आज कोणता हि देश अशी हिंमत बाळगीत नाहीं की, आम्ही सैन्याशिवाय राज्य चालवूं.’ गांधीजींची शिकवण त्यांच्या प्रत्यक्ष मुखांतून आपण आपल्या कानानें अैकली आहे; आणि त्यांच्या बरोबर कांहीं काम हि केलें आहे, असें असून हिन्दुस्थान हि अशी हिंमत करूं शकत नाहीं या बद्दल त्यांनीं दु:ख हि प्रगट केलें होतें. आपले महान नेते पंडित नेहरू अनेक वेळां बोलले आहेत कीं, जगांतील कोणचा हि प्रश्न शस्त्र-बळानें सुटूं शकत नाहीं. आज देशाचे नेतृत्व जे करीत आहेत आणि ज्यांच्यावर जबाबदारी आहे अश

आपल्या मंत्र्यांचा अहिंसेवर दृढ विश्वास आहे, पण परिस्थिति अशी आहे कीं सेना तयार करणें, ती वाढविणें व तिला मजबूत करणें ही जबाबदारी त्यांना पतकरावी लागत आहे. अशा विचित्र परिस्थितीमध्यें आपण आहोंत.

### बुद्धि व हृदय यांचा झगडा.

श्रद्धा अेका वस्तूवर आहे असा आभास होतो तर क्रिया मात्र दुसरी च करावी लागते सर्व जगामध्यें आणि हिन्दुस्थानामध्यें अहिंसेचें च राज्य चालावें अशी इच्छा आहे. आपण अेकमेकाला भिऊं नये, दुसऱ्याला प्रीतीनें जिंकावें, प्रीति च यशस्वी होऊं शकते आणि जिंकू शकते, असा विश्वास हृदयामध्यें भरलेला आहे. पण दुसरी हि वस्तु आमच्यामध्यें आहे. तिला बुद्धि असें नांव दिले जातें. तसें म्हटलें तर बुद्धि ही हृदयाचा च अेक भाग आहे; आणि हृदय हि बुद्धीचा भाग आहे. ही दोन्ही अेकवटलेलीं आहेत. तरी हि हृदय सांगतें कीं 'हिंसेनें कोणचा हि प्रश्न सुटत नाहीं. अेक सुटला असें दिसावें तों त्यांतून च पांच पन्नास नवीन प्रश्न उत्पन्न होतात ! परंतु बुद्धि तीन गुणांनीं भरलेली आहे. तिच्यामध्यें कांहीं विचार करण्याची शक्ति आहे, कांही दर्शन आहे, कांहीं अदर्शन आहे. अशी आमची संमिश्र बुद्धि आम्हांला सांगत आहे कीं, आम्ही सेना सोडूं शकत नाहीं. ज्या जनतेचे आम्ही प्रतिनिधि आहोंत ती अजून तितकी बळकट नाहीं व तिजमध्यें पात्रता हि नाहीं म्हणून अशा जनतेचे प्रतिनिधि या नात्यानें आमच्यावर अशी जबाबदारी येते कीं, आम्ही लष्कर तयार करावें, वाढवावें आणि मजबूत करावें. अशी स्थिति आहे.

अिच्छा होते कीं रचनात्मक काम करावें. पण ती हृदयाची इच्छा आहे. बुद्धि म्हणते कीं, सेना तयार ठेवली पाहिजे. ज्यायोगें सेनायंत्र मजबूत होऊं शकेल अशा यंत्रांना हि स्थान दिलें पाहिजे. ज्यांची चरख्यावर श्रद्धा कमी आहे त्यांची गोष्ट मी सोडून देतों. पण ज्यांची आहे अशांना

प्रश्न पडतो, किंवा त्यांना विचारलें जातें, कीं चरखे आणि ग्रामोद्योग यांच्या साहाय्यानें आपल्याला युद्ध-यंत्र मजबूत बनवितां येईल काय ? युद्ध-यंत्र उभें करतां येईल काय ? तेव्हां त्यांची बुद्धि—म्हणजे च आमची, कारण त्यांच्यांत आम्ही हि येऊन जातों—सांगते कीं, "नाहीं. असल्या लहान लहान उद्योगांच्या द्वारें युद्ध-यंत्र आपण उभे करूं शकत नाहीं."

कम्युनिटी प्रॉजेक्टचें च उदाहरण घ्या. अजून तर थोड्याशा च खेडयांतून तो सुरू झाला आहे. पण पांच लाख खेड्यांमध्यें तो पसरावा आणि त्याच्यायोगें राष्ट्र समृद्ध व्हावें, गरिबी नाहींशी व्हावी अशी सरकारची इच्छा आहे. परंतु उद्यां जगामध्यें महायुद्ध सुरूं झालें कीं अेक तरी कम्युनिटी प्रॉजेक्ट चालू राहील कीं नाहीं याची मला शंका आहे. आणि ज्यांनीं या योजनेचा उपक्रम केला आहे ते देखील हा चालू राहील असें सांगूं शकत नाहींत. तावडतोब बुद्धीचा जोर होईल, हृदय मागें पडेल. हृदयावर बुद्धि स्वार होईल आणि म्हणेल कीं, आतां तर राष्ट्र-रक्षण ही च मुख्य गोष्ट आहे. हें मी आत्म-निरीक्षणाच्या दृष्टीनें बोलत आहें. जे लोक आज तिथें जबाबदारीच्या स्थानांवर आहेत त्या जागीं आम्ही असतों तर आम्ही हि आज ते जें करीत आहेत त्याहून विशेष वेगळें केलें असतें असें म्हणतां येत नाहीं. तें स्थान च असें आहे. ती जादूची खुर्ची आहे. तिच्यावर जो बसेल त्याला अेका संकुचित, ठरीव आणि अस्वाधीन अशा कक्षेंत विचार करण्याची जबाबदारी येते. जगाचा ओघ ज्या दिशेनें वाहतांना दिसतो त्या दिशेनें च नाइलाजानें त्याना विचार करण्याची जबाबदारी येते.

अमेरिकेसारखीं व रशियासारखीं मोठमोठीं राष्ट्रें देखील भितात. प्रत्येकजण अेकमेकाला भितो. पाकिस्तान-हिन्दुस्थानसारखीं कमी शक्तिशाली राष्ट्रें हि अशी च भीति बाळगतात. या प्रमाणें अेकमेकांची भीति बाळगून शस्त्रबळानें अगर सैन्यबळानें कोणचा हि प्रश्न सुटत नाहीं असा विश्वास ठेवून हि आम्ही शस्त्रबल आणि सैन्यबल यांवर च विसंबून रहात आहोंत, आणि

त्यांचा आधार सोडूं शकत नाहीं अशा विचित्र परिस्थितीमध्यें आम्ही आहोंत.

## आमची दयनीय स्थिति

अशा स्थितींत जर कोणी आम्हाला दांभिक अगर ढोंगी म्हणेल तर तसें तो जरूर म्हणूं शकतो, मात्र त्याचें म्हणणें खरें असणार नाहीं. आमच्या मनांमध्यें च जर दुसरी गोष्ट असती आणि आम्ही ती लपवीत असतों तर आम्ही समजून उमजून ढोंगी ठरलों असतों परंतु जिथें मन अेक गोष्ट कबूल करीत आहे आणि परिस्थितिजन्य बुद्धि दुसरी गोष्ट सांगत आहे; आणि म्हणून लाचारीनें ती करावी लागत आहे तर तिला दांभिक स्थिति न म्हणतां दयाजनक स्थिति म्हणत, येईल. अशा दयाजनक स्थितीमध्यें आपण आहोंत. आता च बाबूजींनीं सांगितलें कीं, सर्वोदय-समाज आपल्या मूल विचारावर कायम रहावा आणि आजच्या परिस्थितिमध्यें ते विचार अमलांत आणण्याकरतां त्यानें वातावरण तयार करावें अशी त्या समाजाकडून लोक आशा बाळगीत आहेत. म्हणून जर सर्वोदय-समाज हें करील तर आजच्या आपल्या राष्ट्रीय सरकारला ती सर्वोत्तम मदत होईल. समजा कीं आपल्यांतील च उद्यां कोणी मंत्री झाला आणि कांहीं मंत्र-तंत्र करूं लागला तर त्याचा तो मंत्र व त्याचें तें तंत्र आजच्या सरकारला जितकी मदत पोहोंचवील त्या पेक्षां सैन्यबळाशिवायचा समाज बनविण्याच्या कामीं प्रयत्न करण्यानें तो निःसंशय च अधिक मदत पोहोंचवील.

## आपलें खरें कार्य

कधीं कधीं लोक मला विचारतात 'तुम्ही बाहेर कां रहाता ? राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी तुम्ही च कां घेत नाहीं ?' मी म्हणतों 'ज्या ठिकाणीं गाडीला दोन बैल आधींचे च जोडले आहेत त्या ठिकाणीं मी तिसरा बैल बनून गाडीला काय मदत होणार ? त्या ऐवजीं गाडी योग्य दिशेला जावी म्हणून मी जर रस्ता नीट बनवूं शकलों तर गाडीला

ती माझी जास्तीत जास्त मदत ठरेल. पण जर मी बैल च असेन तर मात्र मला बैल च बनलें पाहिजे.' मी हें अेका विशिष्ट भाषेंत बोलत आहे. मला आशा आहे कीं आपण त्या भाषेचा अर्थ सहन कराल. आपल्या संस्कृतीमध्यें बैलाला जो मान आहे तो मनुष्याला हि नाहीं. आणि त्या च अर्थानें मी बोलत आहें. जो राज्याची धुरा उचलतो त्याला आपण धुरंधर म्हणतों. आणि धुरंधर म्हणजे बैल. तेव्हां असे धुरंधर आम्हांला बनावे लागते. परंतु जे लोक आधीचे च धुरंधर बनले आहेत ते सांगत आहेत कीं ज्यांत आम्ही लागलों आहोंत तें च काम तुम्ही करण्याची गरज नाहीं, ज्या उणीवा आम्हांला भासत आहेत त्यांची पूर्तता जर तुम्ही करूं शकत असाल तर पहा. आणि या आशेनें ते लोक आमच्याकडे पहात आहेत, ही गोष्ट आपण नीट लक्षांत घेतली पाहिजे. जिला मी स्वतंत्र लोकशक्ति म्हणतों ती ज्यायोगें निर्माण होईल अशा च कामाला आपण लागले पाहिजे, तेव्हां च आपण आपल्या सरकारला खरी मदत करूं आणि आपल्या देशाची योग्य सेवा करूं.

## दंडशक्ति व लोकशक्तीचें स्वरूप

मीं आतां च म्हटलें कीं आम्हांला स्वतंत्र लोकशक्ति निर्माण केली पाहिजे. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, हिंसा शक्तीच्या विरोधी पण दंड-शक्तीहून भिन्न अशी लोकशक्ति आम्हांला प्रगट करावयाची आहे. आजच्या आमच्या सरकारच्या हातीं आम्ही जी दंडशक्ति सोंपविली आहे तींत हिंसेचा अंश जरूर आहे, तरी पण त्या हिंसेचा वेगळा च वर्ग केला पाहिजे. कारण सर्व समुदायानें ती त्यांच्या हातांत सोंपविली आहे म्हणून ती निव्वळ हिंसा-शक्ति नसून दंडशक्ति आहे. ह्या दंडशक्तीचा हि उपयोग करण्याचें कारण पडूं नये अशी परिस्थिति देशांत निर्माण करणें हें आमचें काम होय. तें जर आपण करूं तर आपण स्वधर्म ओळखून त्याचें आचरण केलें असें होईल.

तें न करतां दंडशक्तीच्या साहाय्यानें जी जनसेवा होऊं शकते तिचा लोभ धरला तर ज्या विशेष कार्याची अपेक्षा आमच्याकडून केली जात आहे, ती आमच्या हातून पूर्ण होणार नाहीं येवढें च नव्हे तर आम्ही भाररूप हि ठरण्याचा संभव आहे.

मी आणखी थोडें स्पष्टीकरण करतों. मीं म्हटलें कीं दंडशक्तीच्या आधावर सेवाकार्य होऊं शकते आणि तसें करण्याकरतां च आम्ही राज्य-शासनाची इच्छा बाळगली आणि तें हातीं हि घेतलें. आणि जो पर्यंत समाजाला तशी जरूर आहे तो पर्यंत त्या शासनाची जबाबदारी हि आम्ही सोडूं इच्छीत नाहीं. त्यानें सेवा जरूर होईल परंतु दंडशक्तीचा उपयोग च करावा लागूं नये अशी परिस्थिति ज्यायोगें निर्माण होईल अशी सेवा त्यानें होणार नाहीं. मी उदाहरण देतों. समजा लढाई चालू आहे आणि शिपाई जखमी होत आहेत. त्या शिपायांच्या सेवेला जे लोक जातात ते दयेनें प्रेरित झालेले असतात, शत्रु मित्र हि पहात नाहींत. आपला जीव धोक्यांत घालून थेट युद्ध क्षेत्रापर्यंत पोहोंचतात; आणि आई आपल्या मुलाची सेवा करते तशी सेवा हे दयाळू लोक करतात या विषयीं मुळीं च शंका नाहीं. ही सेवा मोलाची आहे हें खरें. पण युद्ध थांबविण्याचें काम ते करूं शकत नाहींत. त्यांची दया युद्ध मान्य असणाऱ्या समाजाचा च अेक भाग आहे. यंत्रांत ज्या प्रमाणें अनेक लहान मोठीं चाकें असतात आणि तीं परस्पर विरुद्ध दिशेनें हि फिरतांना दिसतात तरी पण तीं त्या यंत्राचें च अेक अंग असतात. अशा च युद्ध-यंत्राचें अेक अंग शिपायांची कत्तल करते आणि त्या च यंत्राचें दुसरें अंग जखमी शिपायांची सेवा करते. त्या यंत्राच्या दोन्ही गति स्पष्ट आहेत. अेक क्रूर काम आहे. दुसरें दयेचें काम आहे. त्या दयाळू माणसाची ती दया आणि त्या क्रूर हृदयाची ती क्रूरता मिळून युद्ध बनतें. युद्ध चालू ठेवणारे हे दोन्ही भाग आहेत. वैज्ञानिक कठोर भाषेंत बोलायचें म्हणजे, जोंपर्यंत आमची युद्धास मान्यता आहे तोंपर्यंत आम्ही

शिपायाचा पेशा पतकरला काय किंवा जखमी शिपायांची सेवा करण्याचा पेशा पतकरला काय, युद्धाचे गुन्हेगार च आहोंत. हें उदाहरण अशासाठीं दिलें कीं, आम्ही निव्वळ दयेचें कार्य करीत आहोंत म्हणून दयेचें राज्य बनवूं शकूं असें समजतां उपयोगी नाहीं. राज्य निष्ठुरतेचें च राहील. त्यामध्यें जी दया आहे ती भाकरीमध्यें चवीपुरतें मीठ घालावें तशी आहे. जखमी शिपायांच्या सेवेनें युद्धामध्यें थोडी लज्जत येते इतकें च, परंतु त्या दयेनें युद्धाचा शेवट होत नाहीं. निष्ठुरतेच्या राज्यांत जी दया प्रजेच्या नात्यानें राहते आणि निर्दयतेच्या हुकुमतीखालीं वागते त्या दयेचीं कामें जर आपण केलीं तर आपलें खरें काम आपण केलें असें होणार नाहीं. म्हणून जीं दयेचीं आणि रचनात्मक कामें दिसायला दिसतात तीं दयेच्या आणि रचनेच्या लोभानें व्यापक दृष्टि सोडून आपण करूं तर थोडीशी सेवा आपल्या हांतून होईल खरी, परंतु आपल्यावर ज्या सेवेची जबाबदारी आहे आणि आम्ही व जगानें जिला आपला स्वधर्म मानला आहे, ती मात्र आमच्या हांतून होणार नाहीं.

## प्रेम-शक्तीला आवाहन.

आणखी अेक स्पष्ट उदाहरण देतों. प्रत्येकजण मला विचारतो "तुमचें सरकारवर हि वजन दिसतें. तेव्हां तुम्ही सरकारच्या मागें लागून एखादा कायदा कां करवून घेत नाहीं, आणि बिनामोबदला जामिनीच्या वाटपाचा मार्ग कां खुला करून घेत नाहीं ?" मी त्यांना म्हणतों, अरे बाबा ! कायद्याचा मार्ग मी अडवीत नाहीं. मीं जो मार्ग स्वीकारला आहे त्यांत मला सोळा आणे यश न मिळालें तरी कायद्याची वाट तर मोकळी होईल ! म्हणजे अेक तर मी कायद्याच्या आड येत नाहीं, दुसरें कायदा होण्यास अनुकूल वातावरण तयार करून राहिलों आहे. याच्या हि पुढें तुमच्या दिशेनें अेक पाऊल टाकून 'कायद्याशिवाय काम होणार नाहीं, कायदा बनला च

पाहिजे' असें घोकत बसेन तर मी स्वधर्महीन ठरेन. माझा धर्म तर असें मानण्याचा आहे कीं कायद्याच्या मदतीशिवाय जनतेच्या हृदयांत असा भाव निर्माण करावा कीं त्यांनीं कायदा कसा हि असला तरी आपण होऊन जमिनीचें वाटप करावें. आई मुलाला दूध पाजते ती काय कायद्यामुळें? मनुष्याच्या हृदयांत अशी अेक शक्ति आहे कीं जिच्यामुळें त्याचें जीवन समृद्ध झालें आहे. प्रेम हा मनुष्याचा आधार आहे. प्रेमांतून च तो उत्पन्न होतो, प्रेमानें च वाढतो आणि जेव्हां हें जग सोडून जातो तेव्हां देखील प्रेमाची नजर आसपास टाकून आपले प्रियजन भेटीसाठीं आलेले पाहून सुखानें देह आणि जग सोडून जातो. प्रेमशक्तीचा असा अनुभव असतांना त्या शक्तीचा सामाजिक स्वरूपांत विकास करण्याची हिंमत सोडून देऊन आपण जर कायदा कायदा असें घोकत राहिलों, तर सरकारला आमच्याकडून ज्या मदतीची अपेक्षा आहे ती जनशक्ति निर्माण करण्याची मदत आपण सरकारला केली नाहीं असें होईल. म्हणून दंडशक्तीहून भिन्न अशी जनशक्ति आपल्याला निर्माण केली पाहिजे.

## आपली कार्यपद्धति

दुसरें अेक उदाहरण देतों. आतां खादी बोर्ड बनलें जात आहे, सरकार मदत करूं इच्छिते. पं. नेहरू म्हणाले जें काम चार वर्षांपूर्वीं च व्हायला पाहिजे होतें तें इतक्या उशीरानें कां सुरूं होत आहे, याचें मला आश्चर्य वाटते. ते मोठे आहेत, त्यांचें अंतःकरण मोठें आहे, ते आत्म-निरीक्षण करतात म्हणून अशी भाषा बोलतात. सरकार खादी बोर्ड बनवूं इच्छिते, खादी उत्पादन वाढवूं इच्छिते. तेव्हां सरकारला या कामीं मदत करावी हें आपलें व चरखा संघाचें काम आहे; कारण चरखा संघाला या कामाचा अनुभव आहे, आणि अनुभवी माणसांची या कामाला जरूरी आहे. तरी पण मला असें वाटतें कीं अेक जाणकार नागरिक एवढ्या च नात्यानें सरकारला हवी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 202483 वि: निबंध
क्रमांक 9036 नों: दि: 28/07/54

असलेली मदत दिली पाहिजे. त्या ऐवजीं आम्ही जर त्या कामांत जिरून गेलों तर आमच्याकडून खादीची खरी सेवा होणार नाहीं. आपण खादीविषयक आपली दृष्टि स्पष्ट, शुद्ध राखली पाहिजे आणि त्या दिशेनें काम करीत असतांना खादी उत्पत्तीमध्यें सरकारला जेवढी मदत देतां येईल तेवढी दिली पाहिजे. युद्धें कायमचीं बंद होण्याचा मार्ग शोधीत असतांना युद्ध उद्भवलें तर प्रसंगीं जखमी शिपायांची सेवा करायला हि आम्ही जाऊं, परंतु आमचें खरें काम तें नाहीं हें जसें आम्ही विसरणार नाहीं. तसें आमचें खादीचें काम ग्रामराज्याच्या स्थापनेसाठीं आहे ही गोष्ट दृष्टीआड होऊं देता कामा नये.

## खादीकामांत सरकार कडून आमची अपेक्षा

या वेळीं पं. नेहरू मला भेटण्याकरतां आले होते. फार प्रेमानें बोलले. मीं त्यांचें बोलणें नम्रपणें ऐकून घेतलें. आणि जेव्हां त्यांनीं सल्ला विचारला तेंव्हां माझीं मतें थोडक्यांत त्यांच्यापुढें मांडली. मी त्यांना सांगितलें कीं साक्षरतेच्या बाबतींत सरकारची जी भूमिका आहे, त्या च भूमिकेची खादी व ग्रामोद्योगाचे बाबतींत आमची सरकारकडून अपेक्षा आहे. प्रत्येकाला लिहितां वाचतां आलें पाहिजे, कारण ती अेक नागरिकत्वाची अनिवार्य बाब आहे असें आपण मानतों. आणि म्हणून सरकार लोकांना लिहिणें वाचणें शिकविण्याची जबाबदारी मान्य करते. या बाबतींत सरकारकडून काहीं अडचणीमुळें पुरा अंमल होऊं न शकला तरी, जोंपर्यंत सर्व लोक साक्षर झाले नाहींत तोंपर्यंत आपण आपलें काम पुरें केलें नाहीं ही टोंचणी सरकारला राहील. त्या प्रमाणें सरकारनें हिंदुस्थानांतल्या प्रत्येक नागरिकाला—मग तो खेड्यांतला असो, कीं शहरांतला असो—कांतायला शिकविणें आपलें काम आहे, हा विचार मान्य करावा. ज्याला कांततां येत नाहीं त्याला अशिक्षित समजावें बाकीचें काम जनता करून घेईल. आम्ही सरकारकडून पैशाची मदत मागणार नाहीं. परंतु आमचा वरील विचार

सरकारनें मान्य केला तर खादीला अधिकांत अधिक मदत दिल्यासारखें होईल. असें मीं त्यांना सांगितलें. पंडितजींनीं माझें म्हणणें ऐकून घेतलें. तें त्यांना पटलें हि असावें, पण सहज विनोदानें त्यांनीं म्हटलें, 'सर्वांना कातणें शिकविलें तर त्याच्या उपयोगाचा प्रश्न उपस्थित होईल' मी म्हटलें 'लिहिणें वाचणें शिकविल्यावर त्याच्या हि उपयोगाचा प्रश्न येतो च. मी असे कित्येक शिकलेले लोक पाहिले आहेत कीं जे दोन चार वर्षें शिकले पण साऱ्या जन्मांत त्याचा त्यांना कांहीं उपयोग झाला नाहीं. इतकें च नाहीं पण ते अक्षरज्ञान अजीबात विसरून गेले आहेत. म्हणून उपयोगाचा मुद्दा गौण समजून जनते तर्फे कताई शिक्षणाची मागणी आली तर सरकारनें ती पुरी करायला हवी' इतकें च मी त्यांना सांगितलें. या पेक्षां पुढें जाऊन कायद्यानें लोकांवर खादी लादण्याची मागणी मीं केली असती तर माझें काम मीं ओळखलें नाहीं असें झालें असतें. दंडशक्तीहून वेगळी अशी लोकशक्ति आम्हांला निर्माण करावयाची आहे हें सूत्र मी विसरलों असें झालें असतें.

हीं मीं दोन उदाहरणें दिलीं. अेक भूमिदानाचें व दुसरें खादीचें. आम्ही जमिनीचा प्रश्न सोडवूं त्यांत आमची अेक वेगळी पद्धति राहील. परंतु लोकशाही सरकार तो प्रश्न दंडशक्तीचा उपयोग करून हि सोडवूं इच्छील आणि सोडवील. तसें सरकारनें केलें तर त्याला मी दोष देणार नाहीं. पण तो प्रकार वेगळा आहे. त्यानें लक्ष्मी निर्माण झाली तरी लोकशक्ति निर्माण होणार नाहीं. अशी ही एकूण दृष्टि आमच्या कामामागें आहे.

हें मला थोडक्यांत सांगावयाचें होतें पण विस्तार झाला. जर आमची ही दृष्टि स्थिर झाली तर आमची कार्यपद्धति कशी असेल याचें विशेष वर्णन करण्याची जरूर राहणार नाहीं. प्रत्येक रचनात्मक कामांत आमची विशेष पद्धति राहील आणि लोकांत दंडनिरपेक्षता निर्माण होण्यांत तिचें पर्यवसान होईल हें सहज लक्षांत येईल.

## विचार-शासन आणि कर्तृत्व-विभाजन

या दृष्टीनें विचार केला तर आपल्या सहज लक्षांत येईल कीं आपल्या कार्यपद्धतीचे दोन भाग आहेत, अेक विचार-शासन आणि दोन कर्तृत्व-विभाजन. मला जरा शास्त्रीय शब्द बनविण्याची संवय आहे. कारण संस्कृत भाषा च मला विशेष येत असल्यामुळें संस्कृत शब्द च एकदम सुचतात. पण तुम्ही त्या बद्दल क्षमा कराल अशी आशा आहे.

विचार-शासन म्हणजे विचार समजून घेणें आणि समजावून सांगणें; विचार समजल्या शिवाय कोणती हि गोष्ट मान्य न करणें; आणि विचार समजून न घेतां कोणी आपलें म्हणणें कबूल केलें तर दुःखी होणें; आपली इच्छा दुसऱ्यावर न लादतां केवळ विचार समजावून संतुष्ट राहणें. सर्वोदय-समाजाची जी रचना आहे तिला कोणी 'लूज ऑर्गनायझशन' म्हणजे शिथिल रचना म्हणतात. रचना शिथिल असेल तर कांहीं काम च होणार नाहीं, म्हणून रचना शिथिल असतां कामा नये. परंतु सर्वोदय-समाजाची रचना शिथिल नसून ती अ-रचना आहे. म्हणजे केवळ विचाराच्या आधारावर च आम्ही उभे राहूं इच्छतों. आम्ही कोणाला असे आदेश देणार नाहीं कीं जें समजून न घेतां लोकांनी अमलांत आणावेत, आणि आम्ही हि कोणाचे असे आदेश ऐकणार नाहीं कीं विचाराला न पटतां आम्ही त्याचा अंमल करावा. आम्ही केवळ विचार-विनिमय करतों. कुराणामध्यें भक्ताचें वर्णन केलें आहे कीं तो "अम्र" म्हणजे काम अेकमेकांच्या सल्ल्यानें करतो. असा विचार विनिमय आम्ही जरूर करूं. आणि आमची गोष्ट समोरच्यानें न पटल्यामुळें मान्य केली नाहीं तर आनंद मानूं. इतकें च नाहीं तर आमचा विचार समजून न घेतां त्यानें त्याचा अंमल केला तर दुःखी होऊं. अशा रचनेंत मला जितकी शक्ति दिसून येते तितकी मोठ्या कुशल, आणि शिस्तबद्ध रचनेंत हि दिसत नाहीं. शिस्तबद्ध रचनेमध्यें शक्ति नसते असें नाहीं. परंतु ती शिवशक्ति असत नाहीं. आम्हांला शिवशक्ति निर्माण करावयाची आहे. म्हणून विचार-शासन

च आम्ही इच्छितों.

## विचाराला प्रचाराची जोड.

इतकें आमच्या लक्षांत आलें तर मग आमच्या विचाराचा निरंतर प्रचार करीत राहणें हा एक आमचा कार्यक्रम होईल, जो आम्ही अद्याप करीत नाहीं पण यापुढें जोरानें केला पाहिजे. या दृष्टीनें मी जेव्हां विचार करूं लागतों तेव्हां भगवान बुद्धांनीं भिक्षुसंघ आणि शंकराचार्यांनीं यतिसंघ कां बनविले असतील याचें रहस्य उलगडतें, जरी त्या संघांसंबंधींच्या अनुभवांतून दिसून आलेल्या गुणदोषांची तुलना करतां अशा संघांमध्यें आपण पडतां कामा नये असा च निर्णय माझ्या मनानें दिला आहे. कारण अशा संघामध्यें गुणांपेक्षां दोष च अधिक असतात असा अनुभव आला आहे म्हणून आम्ही संघ जरी बनविले नाहींत तरी शंकराचार्यांना आणि बुद्धदेवांना जे संघ बनवावे लागले त्या मागें काय विचार होता तो लक्षांत घेतला पाहिजे. अखंड वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणें नेहमीं फिरत राहणारे आणि जनतेपर्यंत पोहोंचून त्यांना आपले विचार सतत सांगणारे लोक आम्हांला हि पाहिजेत, त्यांच्या शिवाय सर्वोदय-समाज काम करूं शकणार नाहीं. लोकांत मिसळण्याचे जितके प्रसंग येतील त्यांचा उपयोग केला पाहिजे. एकदां सांगून लोकांनीं ऐकलें नाहीं तर दुसऱ्यांदा सांगण्याची संधि आपल्याला मिळाली म्हणून आनंद वाटला पाहिजे. इतका विचार-प्रचाराचा उत्साह, व इतकी विचारावर श्रद्धा आणि निष्ठा आमच्यांत असली पाहिजे.

परंतु आमच्यांतील पुष्कळसे लोक वेगवेगळ्या संस्थांमध्यें अडकून पडले आहेत. या संबंधीं विस्तारानें मी मागाहून सांगेन. आतां फक्त उल्लेख करतों. या संस्था महत्वाचा खऱ्या, पण त्यांची आपल्याला असक्ति असूं नये, भक्ति असावी; तिचें काम जरूर चालूं रहावें. परंतु संस्थेंत असे हि कांहीं लोक असावेत कीं जे बाहेर फिरत राहतील. अशी रचना आणि असा

कार्यक्रम आपण रचला नाहीं तर आपला विचार क्षीण होईल; विचार-शासन चलणार नाहीं, आणि विचारा शिवाय तर दुसरें कोणतें शासन आपल्याला चालवावयाचें नाहीं.

## नियमबध्द संघटनेंतील एक दोष.

बिहारचे लोक कांहींशा अभिमानानें म्हणत आहेत कीं, भूदान-यज्ञाचें काम बिहार कॉंग्रेसनें प्रथम हातीं घेतलें. मागाहून हैद्राबादमध्यें अखिल भारतीय कॉंग्रेसनें त्याचा स्वीकार केला. पण स्वीकार केला म्हणजे काय झालें ? 'भूदानाच्या कामांत मदत करणें कॉंग्रेसवाल्यांचे कर्तव्य आहे' असें वरून अेक सर्क्यूलर (परिपत्र) निघतें. मग गंगा हिमालयांतून निघून हरिद्वारला येते त्या प्रमाणें तें पत्रक प्रांतिक समितिकडे येतें. मग हरिद्वारहून गंगा गढमुक्तेश्वरला वहात जाते तसें तें पत्रक तेथून जिल्हा ऑफीसमध्यें जातें. अशा रीतीनें पत्रकांतून पत्रक निघत जातें. मीं एकदां विनोदानें म्हटलें होतें कीं प्रत्येक जात आपल्या च जातीला वाढवीत असते. त्या प्रमाणें पत्रक पत्रक च निर्माण करतें. मग काम कोण करणार ? काम तर करावयाचें आहे खेड्यांतील लोकांनीं. पण तें पत्रक खेड्यांतील लोकांपर्यंत पोहोंचेल तर नां ! तें तर एका ऑफीसमधून दुसऱ्या ऑफीसमध्यें व तेथून तिसऱ्या ऑफीसमध्यें जातें इतकें च.

## घरोघर पोंचण्याची जरूर

म्हणून हा आपला भूदान यज्ञाचा कार्यक्रम आपण घरोघर पोहोंचविल्याशिवाय सिद्ध होणार नाहीं. पांचलाख खेड्यांतून पंचवीस लाख एकर जमीन आपण मिळवूं इच्छितों, काम तर सोपें दिसतें. प्रत्येक गांवांतून पांच एकर मिळविणें ही कांहीं मोठी गोष्ट नव्हे. पण इतक्या गांवांपर्यंत पोहोंचणार कोण ? म्हणून विचार-प्रचार हें च आमचें साधन असणार आणि त्याची योजना करणें हा आमचा कार्यक्रम ठरेल.

पण तितकी आमची हिंमत नसेल आणि इतक्या गांवांत आपण कसे पोंचणार असें वाटून जवळचा मार्ग, म्हणजे इंग्रजीमध्यें ज्याला 'शॉर्ट-कट' म्हणतात तो, स्वीकारून 'कायदा करून टाकावा' असें जर आम्ही म्हणूं लागलों तर तसें म्हणणें आणि कायदा बनविणें हें आमचें काम मात्र नव्हे. कायदा जरूर बनावा, लवकर बनावा, आणि चांगला बनावा, पण त्या कामाला आम्ही च लागूं तर तें परधर्माचरण ठरेल, स्वधर्माचरण ठरणार नाहीं. गांवोगांव फिरायला लागून विचारावर विश्वास ठेवणें हा आमचा स्वधर्म आहे. विचार सांगत बसण्यानें केव्हां काम होणार असें वाटूं देऊं नये. कारण विचारानें च काम होईल. म्हणून विचाराची सत्ता, विचार-शासन हें एक आमचें साधन आहे.

## दुसरें साधन कर्तृत्व-विभाजन

दुसरें साधन कर्तृत्व-विभाजन, म्हणजे सर्व कर्म-शक्ति व कर्म-सत्ता एका च केन्द्रांत न राहतां ती गांवोगांव निर्माण होणें. आपल्या गांवांत कोणची वस्तु येऊं द्यावी व कोणची येऊं देऊं नये याचा निर्णय करण्याचा प्रत्येक गांवाला हक्क असला पाहिजे असें आमचें म्हणणें आहे. आपल्या गांवांत हातघाणीचें च तेल असावें, मिलचें येऊं नये, असें जर एखाद्या गांवाला वाटलें तर मिलचें तेल गांवांत येण्यास बंदी करण्याचा हक्क त्या गांवाला असला पाहिजे. पण असा हक्क असावा असें म्हटल्यावर सरकार म्हणतें कीं 'एका मोठ्या राज्याच्या पोटांत दुसरें एक छोटें राज्य चालूं शकणार नाहीं.' मग मी म्हणतों कीं असें सत्ता-विभाजन, कर्तृत्व-विभाजन तुम्ही केलें नाहीं तर सैन्यबल अनिवार्य आहे हें समजून चला. आज तर सैन्याशिवाय चालत च नाहीं. पण पुढें हि कधीं चालणार नाहीं. मग कायमचा निर्णय करून टाका कीं सैन्यबलानें च राज्य चालवावयाचें आहे आणि त्यासाठीं सैन्य सुसज्ज राखावयाचें आहे. सैन्य-बलांतून आम्ही मुक्त होऊं इच्छितों, असली भाषा मग कधीं बोलूं नका.

### परमेश्वराचें कर्तृत्व-विभाजन

पण जर सैन्यापासून कधीं काळीं सुटका करून घ्यायची असेल तर परमेश्वरानें केलें तसें आपल्याला केलें पाहिजे. परमेश्वरानें सर्वांना अक्कल दिली आहे. विंचवाला दिली आहे, सापाला वाघाला व मनुष्याला हि दिली आहे, कमी अधिक कां होईना, पण प्रत्येकाला अक्कल दिली आणि सांगितलें कीं "आपल्या अकलेच्या आधारावर आतां आपलें जीवन चालवा." मग सारी दुनिया इतकी उत्तम चालूं लागली कीं तो सुखानें विश्रांति घेऊं शकला आणि खरोखर परमेश्वर जगांत आहे कीं नाहीं इथपर्यंत लोकांना शंका येऊं लागली. आपल्याला राज्य असें चालवावयाचें आहे कीं राज्यसंस्था आहे कीं नाहीं अशी शंका लोकांना यावी. हिन्दुस्थानमध्यें बहुधा राज्यसत्ता च नाहीं असें हि लोक म्हणतील असें झालें म्हणजे तें अहिंसक राज्यशासन झालें.

### सैन्यबलाचा छेद कसा उडेल.

म्हणून आम्ही ग्रामराज्याच्या स्थापनेची खटपट करतों आणि गांवाला नियंत्रणाची सत्ता असावी अशी मागणी करतों. हें हि एक जनशक्तीचें च उदाहरण आहे, कीं गांववाल्यांनीं आपल्या पायावर उभे राहून अमुक वस्तु आम्ही स्वतः बनविणार असा निर्णय करावा. आणि सरकारकडे मागणी करावी कीं ती वस्तु आमच्या येथें येण्यास बंदी करा, आणि सरकारनें जर तशी बंदी घातली नाहीं किंवा तें बंदी घालूं शकलें नाहीं तर सरकारच्या विरुद्ध उभे राहण्याची गांवच्या लोकांनीं हिंमत करावी हें जनशक्ति निर्माण झाल्याचें च लक्षण आहे. अशी शक्ति निर्माण झाली तर त्यानें सरकारला सर्वांत मोठी मदत केल्या सारखें होईल. कारण या मार्गानें च सैन्यबलाचा छेद उडणार आहे. समजा कीं दिल्लीमध्यें एखादी अक्कल उत्पन्न झाली—अगदीं ब्रह्मदेवाची म्हणा, कीं ज्याला चार डोकीं आहेत आणि चारी दिशांकडे जो पाहूं शकतो—तरी ती अक्कल दिल्लींत बसून प्रत्येक गांवचें नियंत्रण आणि नियोजन करील

आणि तें सारें नियोजन सर्वांना लाभदायक होईल, असें कधीं च होणार नाहीं

## योजना राष्ट्राची नको, खेड्याची हवी

म्हणून नॅशनल प्लॅनिंगच्या ऐवजीं व्हिलेज प्लॅनिंग झालें पाहिजे असें मी म्हणतों. मीं 'ऐवजीं' म्हटलें. पण खरें म्हणजे व्हिलेज प्लॅनिंगचा च (ग्रामीण नियोजन) अर्थ नॅशनल प्लॅनिंग (राष्ट्रीय नियोजन) असला पाहिजे. आणि अशा व्हिलेज प्लॅनिंगला जी कांहीं मदत लागेल, तेवढी च दिल्लीहून दिली जावी.

अशा रीतीनें कर्तृत्वविभाजन हा आमच्या कार्यक्रमाचा दुसरा भाग झाला. आम्ही जें कांहीं करीत आहोंत तें सारें या च दिशेनें. म्हणूनच आम्ही गांवामध्यें जमिनीचें विभाजन करूं इच्छितों.

## आमचें खरें भांडवल – मजुरांची अकल

जमिनीसंबंधीं जेव्हां प्रश्न निघतो तेव्हां कांहीं लोक म्हणतात कीं 'सीलिंग' ठरवा. म्हणजे अधिकांत अधिक किती जमीन एका जवळ असावी तें ठरवा. भूदान यज्ञाच्या चळवळीला जोर आल्या पासून आणि जनतेमध्यें एक भावना निर्माण झाल्यापासून एवढी गोष्ट तरी लोक बोलूं लागले आहेत ! पण मी म्हणतों कीं प्रथम कमींत कमी किती जमीन प्रत्येकाला दिली पाहिजे हें आधीं ठरवा. असें मी कां म्हणतों, मी कर्तृत्व विभाजन करूं इच्छितों म्हणून. आज सारे मजूर दुसऱ्याच्या हाताखालीं काम करीत आहेत. काम तर ते करतात पण त्यांच्या हातीं कर्तृत्व नाहीं. चालते गाडी च पण त्या गाडीला आपण कांहीं करता मानीत नाहीं; कारण ती चेतन–विहीन आहे. आज जे मजूर शेतांत काम करीत आहेत ते हि चेतन–विहीन असल्यासारखें करीत आहेत. हातापायांनीं काम करतात पण आपल्या बुद्धीनें आणि मनापासून त्यांनीं तें काम करावें असें आम्ही इच्छितों. हिन्दुस्थानांतील मजुरांमध्यें तितकी अकल नाहीं म्हणून त्यांनीं दुसऱ्याच्या हाताखालीं च राहणें बरें असें

कोणी म्हटलें तर मी म्हणेन कीं हा अहिंसेचा मार्ग नाहीं. त्यांच्या जवळ असलेल्या अकलेचा त्याग केल्यास दुसऱ्या कोणत्या अकलेचा खजिना आपल्या जवळ नाहीं.

एखाद्या भांडवलवाल्याची अक्कल एखाद्या मजुराच्या अकलेपेक्षा जास्त आहे असें मानलें तरी सर्व मिळून देशांतल्या मजुरांची जी अक्कल आहे त्या अकलेची बरोबरी दुसरी कोणची हि अक्कल करूं शकणार नाहीं. आणि या अकलेचा जर उपयोग झाला नाहीं तर आपला देश करंटा ठरेल. म्हणून मजुरांची जी कांहीं अक्कल आज आहे तिचा पुरा उपयोग करणें आणि त्या बरोबर च त्यांची अक्कल वाढावी अशी योजना करणें जरूर आहे, आणि अशी त्यांची अक्कल वाढविण्याची जी कोणती योजना असेल त्यांत त्यांना जमीन देणें ही एक योजना असली पाहिजे. या शिवाय त्यांना अधिक शिक्षण हि दिलें पाहिजे त्यांच्या हातीं जमीन देणें हें हि त्या शिक्षणाचें च एक अंग होईल आणि त्यांची अक्कल वाढविण्याचें एक साधन होईल.

## कार्य रचना : (१) सर्वोदय-समाज

आतां मी कार्यरचनेकडे वळतों. एक 'सर्व-सेवा-संघ' आणि दुसरा 'सर्वोदय-समाज' अशी आम्ही रचना केली आहे. नांव सर्वोदय-समाजाचें चालेल, काम सर्व-सेवा-संघ करील. सर्व-सेवा-संघ शिथिल संस्था नसून नियमबद्ध संस्था आहे; आणि सर्वोदय-समाज शिथिल अथवा अशिथिल नसून केवळ एक अ-रचना आहे, विचाराची सत्ता मान्य करणारा समाज आहे, म्हणून सर्वोदय-समाज अधिक विचार-परायण कसा होईल याचा आम्ही विचार केला पाहिजे, तो शिस्तबद्ध कसा होईल याचा विचार करण्याची आम्हांला जरूर नाहीं. कारण केवळ अनुशासन पाळणारा समाज आम्ही बनवूं इच्छीत नाहीं. आमचा हा समाज विचारवान कसा होईल, विचाराची सत्ता मानणारा कसा होईल या दिशेनें आपण काम केलें पाहिजे. म्हणून जेवढे

सर्वोदय-समाजाचे सेवक या ठिकाणीं जमले आहेत त्यांच्यासाठीं व ज्या सेवकांनीं आपलें नांव नोंदविलें नाहीं आणि जे येथें आले हि नाहींत त्यांच्या हि साठीं, विचाराची एक संगति निर्माण करण्याचें काम आपल्याला केलें पाहिजे. यासाठीं एक गोष्ट मी ही सांगितली कीं विचाराचा निरंतर प्रचार झाला पाहिजे व त्यासाठीं फिरलें पाहिजे. आतां दुसरी गोष्ट ही सांगावयाची आहे कीं सर्वोदय-साहित्याचा प्रचार व त्या साहित्याचें चिंतनमनन, अध्ययन झालें पाहिजे. आमच्या विचाराची दुसऱ्या विचारांशीं तुलना करून त्याचा अभ्यास करणारे वर्ग ठिकठिकाणीं चालले पाहिजेत.

## कार्य रचना : (२) सर्व-सेवा-संघ

यासाठीं सर्व-सेवा-संघ ही एक एक-रस संस्था बनविली पाहिजे. पण इच्छा असून हि या दृष्टीनें आम्ही विशेष करूं शकलों नाहीं ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. पण आपण जर हें केलें नाहीं तर जनतेच्या आपल्या संबंधीं ज्या अपेक्षा आहेत त्या आपण पुऱ्या करूं शकणार नाहीं, असें माझें मत आहे. जुन्या पद्धतीनें च वेगवेगळ्या संस्था अलग अलग काम करीत राहिल्या तर त्यांतून शक्ति निर्माण होणार नाहीं.

मी एक उदाहरण देतों. उदाहरण देतांना मी एखाद्याचें नांव घेतलें तर त्याचा मी दोष दाखवीत आहे असें कोणी मानू नये. दोष मी स्वतःचा च दाखवीत आहें. आणि तो दुसऱ्यासमोर न दाखवितां स्वतः समोर च दाखवीत आहे. अशा दृष्टीनें त्या दोषाचें उच्चारण मी करीन. हिन्दुस्थानी-प्रचार-समिति च घ्या. त्या ठिकाणीं काय चाललें असेल ? विद्यार्थी येत असतील, पूर्वीपेक्षां आतां कमीं च येत असतील, कारण तेथें नागरी आणि उर्दू दोन्ही लिप्या शिकाव्या लागतात. त्याला आज अनुकूल वातावरण नाहीं, परंतु तरी हि जे विद्यार्थी येत असतील ते दोन्ही लिप्या, दोन्ही भाषा शिकणें आपलें कर्तव्य समजत असतील, परंतु आपला समाज एक जिनसी करावयाचा असेल,

दा. क्र. ८९८६

तर हिंदुस्तानी प्रचाराच्या शिक्षणाकरतां येणाऱ्या लोकांनीं हि चार तास शेतीचें काम करावें, त्यानंतर एखादा तास कताईचें काम करावें. मग एखादा तास स्वयंपाक वगैरे काम करावें. नंतर तीन चार तास उर्दू किंवा हिंदी जें कांहीं त्यांना शिकावयाचें असेल तें शिकावें. पण आज जें चाललें आहे त्यांतून शक्ति निर्माण होण्याचा मला संभव दिसत नाहीं. म्हणजे कांहीं विद्यार्थ्यांना घेऊन त्यांना फक्त उर्दू व नागरी लिपि शिकवीत बसण्यानें देशांत शक्ति वाढणार नाहीं. आतां असें पहा, मी बोलत आहें, तुम्ही ऐकत आहांत, जर तुमचा कान कापून ऐकण्याकरतां या टेबलावर ठेवला व माझी जीभ कापून त्या ठिकाणीं बोलण्याकरतां ठेवली तर मी बोलू हि शकणार नाहीं व तुम्ही ऐकूं हि शकणार नाहीं. मी समग्र आहे व तुम्ही हि समग्र आहांत म्हणून मी बोलूं शकतों व तुम्ही ऐकूं शकतां. आतां हें खरें कीं या वळीं माझी फक्त जीभ काम करीत आहे आणि तुमचे फक्त कान काम करीत आहेत, तसें हिंदुस्तानी प्रचार सभेंत मुख्य चार तासांचें जें काम राहील तें उर्दू-नागरी लिप्या शिकविण्याचें राहील. पण बाकीच्या जीवनांतील आमच्या साऱ्या गोष्टी तिथें दाखल करून समग्रता आणली तरच त्या उर्दूमध्यें ताकत येईल व त्या नागरीमध्यें ताकत येईल. या उदाहरणासारखीं मी आणखी किती तरी उदाहरणें देऊं शकेन.

## एकांगी कामानें शक्ति निर्माण होत नाहीं.

आपली मंडळी जीं वेगवेगळीं कामें करीत आहेत त्यांतून शक्ति कां निर्माण होत नाहीं, आणि ज्या क्रांतीची आपण अपेक्षा राखतों ती जनतेंत कां निर्माण होत नाहीं याचें एक च प्रमुख कारण मला दिसतें. तें हें कीं आमचे संघ अलग अलग व एकांगी काम करीत आहेत. काम तर ते चांगलें करतात यांत शंका नाहीं. पण कांहीं एका मोहामुळें त्यांना असें वाटतें कीं आपण स्वतंत्र राहिल्यामुळें त्या त्या कामाचा जसा विशेष विचार करूं

शकतों तसा एकत्र झाल्यानंतर करूं शकणार नाहीं आणि अनेक विषयांकडे लक्ष दिल्यामुळे आपापल्या खास विषयाकडे एकाग्रतेनें पहावयास मिळणार नाहीं. प्रत्येक योजनेमध्यें कांहीं उणीवा असतात तशीं कांहीं वैशिष्ट्यें हि असतात हें मला मान्य आहे. परंतु एकूण विचार करतां सर्व-सेवा-संघ एक बनविल्याशिवाय शक्तीचें दर्शन होणार नाहीं, हें ध्यानांत येईल.

कार्य-रचनेसंबंधीं माझें म्हणणें मीं सांगितलें. आतां शेंवटीं जीं दोन-तीन कामें हातीं घेतलीं आहेत त्या विषयीं थोडें सांगून संपवितों.

## आमचीं अंगीकृत कार्यें : (१) भूदान-यज्ञ

भूदान-यज्ञाचें काम आम्हीं सुरूं केलें आहे. त्यासंबंधीं माझ्या मनांत असें आहे– आणि जें मीं नेहमीं बोलून दाखवीत असतों– कीं कमींत कमी पांच कोट एकर जमिनीचें हस्तांतर १९५७ च्या आंत घडवून आणलें पाहिजे. आपण सर्व–म्हणजे सर्वोदय-समाजाचे समजले जाणारे च केवळ नव्हे, तर ज्यांना ज्यांना हा विचार पटतो असे कॉंग्रेसवाले, प्रजासमाजवादी, इत्यादि सर्व–जर या कामीं लागलों तर जमिनीचा प्रश्न आपण सोडवूं शकूं. मग सोळा आणे यश मिळून कायद्याशिवाय हा प्रश्न सुटो किंवा बारा आणे, आठ आणे यश मिळून कायद्याच्या मदतीनें तो सुटो. मी कांहीं भविष्यवादी नाहीं. त्यामुळें नेमका तो कसा सुटेल हें मी सांगू शकणार नाहीं. प्रश्न कसा हि सुटो परंतु मुख्यतः जनशक्तीच्या द्वारें सुटो. केवळ जनशक्तीनें च हें काम पूर्ण झालें तर मी आनंदानें नाचूं लागेन. १९५७ च्या आंत जर हें काम आपण करूं शकलों तर पुढील निवडणुकी सज्जना-सज्जनांच्या पक्षांत होणार नाहींत. आज तर स्थिति अशी आहे कीं या हि पक्षांत सज्जन आहेत व त्या हि पक्षांत सज्जन आहेत, आणि भीष्मार्जुन युद्ध चाललें आहे. आम्हांला भीष्मार्जुन युद्ध नको, राम-रावण युद्ध पाहिजे. दोन्ही पक्षांत सज्जन आहेत तर ते एक कां होऊं शकत नाहींत ? एकाग्र होऊन काम करण्यासारखा

कार्यक्रम जर मिळाला तर त्यांच्यांत जे अवांतर मतभेद आहेत ते तावडतोब नाहींसे होतील.

भूदान-यज्ञाचा कार्यक्रम असा मौलिक कार्यक्रम आहे असें मला वाटतें. समाजवादी म्हणतात, 'तुम्ही हा आमचा च कार्यक्रम हातीं घेतला' मी त्यांना म्हणतों, "मला कबूल आहे. व म्हणून च तुम्ही कृपा करून मला मदत करा." काँग्रेसवाले म्हणतात, "हा कार्यक्रम फार चांगला आहे. आम्हांला तो करायचा च होता"! तेव्हां मी त्यांच्याकडून हि मदत मागतों. जनसंघवाले म्हणतात, "तुमचा कार्यक्रम भारतीय संस्कृतीला अनुकूल आहे. म्हणून चांगला आहे" अशा रीतीनें भिन्न भिन्न पक्षाच्या लोकांना हा कार्यक्रम पसंत आहे. तेव्हां आम्ही सर्व जर या कामाला लागलों तर नव्या निवडणुकांमध्यें वेगवेगळया पक्षांमधील मतभेद उरणार नाहींत आणि चांगले लोक च निवडून येतील, आणि त्यामुळें नवें सरकार फार मजबूत होईल अशी शक्यता आहे. तेव्हां १९५७ पर्यंत पांच कोट एकर, आणि पुढील वर्षांत पंचवीस लाख एकर हा आपला संकल्प पुरा झाला पाहिजे.

## (२) संपत्तिदान-यज्ञ

या बरोबर च संपत्तिदान-यज्ञ नांवाचा दुसरा कार्यक्रम मीं सुरूं केला आहे. त्याशिवाय भूदान-यज्ञाची सफलता होणार नाहीं. आर्थिक-स्वातंत्र्य आणि आर्थिक-समता ही हि त्याशिवाय साधणार नाहींत. सुरवातीला च ही गोष्ट माझ्या लक्षांत आली होती, परंतु 'एक साधे सब सधे' ह्या म्हणीप्रमाणे दोन्ही गोष्टी एकदम सुरूं करणें शक्य नव्हतें, आणि जमिनीच्या इतका संपत्तीचा प्रश्न मौलिक हि नव्हता. म्हणून तेलंगणांतील परमेश्वरी संकेत ओळखून जमिनीचा प्रश्न प्रथम हातीं घेणें मला बरें वाटलें. पण पुढें बिहार-मध्यें भूमीचा प्रश्न पूर्णपणें सोडविण्याची गोष्ट निघाली तेव्हां लक्षांत आलें कीं संपत्तिदान-यज्ञाची जोड दिल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाहीं. संपत्ति-

दानावर मीं पुष्कळ लिहिलें आहे, बोललों आहे, व चर्चा हि केली आहे, म्हणून येथें विस्तार करीत नाहीं. मात्र इतकें च सांगू इच्छितों कीं त्यांत संपत्ति आमचे हातांत आम्ही घेणार नाहीं. त्यांत हि कर्तृत्व-विभाजन च आम्ही इच्छितों. म्हणजे जो संपत्ति देईल तो आमच्या निर्देशाप्रमाणें तिचा विनियोग करील. परंतु भूमिदान-यज्ञाप्रमाणें गांवोगांव फिरून, प्रचार करून, सामुदायिक रीतीनें मात्र संपत्तिदान-यज्ञाचा व्यापक प्रचार करण्याचा माझा इरादा नाहीं. व्यक्तीशी आणि त्याच्या कुटुंबाशीं प्रेमानें बोलून त्यांच्या अंतः-करणांत प्रवेश करून च हें काम करावयाचें आहे. आजपर्यंत ज्यांनीं असें संपत्तिदान दिलें आहे तें ते आमरण दरवर्षी तसें देणार आहेत.म्हणून त्यांच्याशीं बोलून त्यांची परीक्षा करून च त्यांचें दान मीं स्वीकारलें आहे. अशा रीतीनें संपत्तिदान-यज्ञाला उत्तेजन देण्याऐवजीं थोडें नियंत्रण च मीं ठेवलें आहे. आतांपर्यंत सुमारें चाळीस पंचेचाळीस लोकांनीं आपलीं नांवे दिलीं आहेत. या विषयाची जास्त चर्चा मी येथें करीत नाहीं, पण ज्यांच्या जवळ कांहीं गठडी आहे त्यांनीं ती सोडून या संपत्तिदानांत भाग घ्यावा; आणि आपल्या स्नेह्या-सोबत्यांत त्याचा प्रचार करावा येवढें च मी येथें सांगतों. भूमि-दान आणि संपत्ति-दान हीं दोन्हीं कामें एकमेकास पूरक आहेत. परंतु पंचवीस लाख एकर जमीन मिळविण्याचा आपला जो संकल्प आहे, त्याच्यावर च सध्यां जोर द्यावयाचा आहे. संपत्तिदानाचें काम सार्वजनिक रीतीनें चालवावयाचें नाहीं, व्यक्तिगत होईल तेवढें च करावयाचें आहे.

## (३) सूतांजलि

या दोन कामांशिवाय तिसरें सूतांजलीचें काम आहे. ह्या कामामध्यें फार मोठी शक्ति आहे, ती अजून आम्हीं ओळखली नाहीं. बापूंची स्मृति म्हणून, शरीरश्रमाची प्रतिष्ठा म्हणून, आणि देशांत लक्ष्मी वाढीवण्याची जबाबदारी म्हणून, सूत समर्पण करावयाचें आहे. एक गुंडी म्हणजे सर्वोदयाचें

एक मत, असें मीं मानलें आहे. ही मोठी गोष्ट आहे. पण त्यांत अडचण एक च आहे कीं घरोघर व गांवोगांव पोंचावें लागते. पण ती मी अडचण मानीत नाहीं, तर आमच्या कामासाठीं एक उत्साहवर्धक गोष्ट मानतों. कारण या निमित्तानें घरोघर जाण्याची संधि आपणांस मिळेल. हें काम आपणाला वाढवावयाचें आहे. ज्या प्रमाणें पंचवीस लाख एकर जमीन मिळविण्याचा आपण संकल्प करीत आहोंत, त्या प्रमाणें लाखो गुंड्या सूतांजलि मिळविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. श्रमाची प्रतिष्ठा वाढविण्यांत त्याचा पुष्कळ उपयोग होणार आहे.

### श्रम-दान

आणखी एक गोष्ट यांतून व्हावी अशी माझी इच्छा आहे. आजपर्यंत आपण जितक्या संस्था चालविल्या त्या पैशाच्या आधारावर चालविल्या. पैसे देणारे लोक आमचे स्नेही होते, आमच्यावर प्रेम आणि सहानुभूति राखणारे होते, ते शुद्ध हृदयानें च आम्हांला मदत करीत होते. अशी मदत घेण्यांत आम्ही चूक केली असें हि मला म्हणायचें नाहीं. पण आतां युग बदललें आहे. श्रमाची प्रतिष्ठा आपण वाढविली पाहिजे. म्हणून प्रत्येक प्रांतामध्यें श्रमाच्या आधारावर चालणारी एखादी तरी संस्था आपण उभी करूं शकलें, तर केली पाहिजे. दान द्यावयाचें झालें तर तें श्रमाचें च द्यावयाचें. सूतांजलीचा जर पुष्कळ प्रसार झाला तर अशा संस्था आपण चालवूं शकूं. त्यांतून तेजस्वी कार्यकर्ते निर्माण होतील, ते प्रचार हि करूं शकतील आणि काम हि करूं शकतील. अशी माझी योजना आहे.

बंधूनो ! विचाराचीं जेवढीं अंगें होतीं तीं थोडक्यात मीं तुमच्या समोर मांडलीं. सर्वोदय-समाजाच्या सभेला आपण येतों तेव्हां जीवनाच्या अनेक बाबींवर विचार व चर्चा करावी लागते, ती आपण करावी च. परंतु मीं ज्या मुख्य गोष्टी आपणांपुढें मांडल्या त्यांचा आपण विचार करा, चिंतन

करा, मनन करा, आणि या कामीं शक्य तर पुढचें सबंध वर्ष द्या अशी माझी विनंति आहे.

### आपण सगळे मानव

शेवटीं दोन शब्द सांगूं इच्छितों. आपलें काम एका संप्रदायाचें नाहीं. 'सर्वोदयवाले' असा शब्द हि ऐकूं येतां कामा नये. आम्ही केवळ मानव आहोंत, मानवाहून वेगळे आम्ही नाहीं; हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. नाहीं तर पाहतां पाहतां हा सर्वोदय-समाज आज जरी अनुशासनबद्ध नसला तरी पुढें पांथिक व सांप्रदायिक बनेल आणि आपण इतराहून वेगळे पडूं. म्हणून अमका समाजवादी, अमका कॉंग्रेसवाला, अमका सर्वोदयवादी अशी भाषा हि आपल्या तोंडून निघतां कामा नये.

### तिसरी शक्ति

इतर नांवें भले चालोत व चालतील हि. कारण ते लोक त्या त्या नांवानें काम करूं इच्छितात व त्याची उपयुक्तता मानतात.

पण आमचा मात्र कोणता हि पक्ष नाहीं. जिला तिसरी शक्ति म्हणतात ती आम्ही आहोंत. जगाच्या आजच्या परिभाषेंत तिसरी शक्ति याचा अर्थ अमेरिका किंवा रशिया या पैकीं कोणत्या च गटांत सामील न होणारी शक्ति असा होतो. परंतु मी तिसरी शक्ति म्हणतों यांत माझा अर्थ असा आहे कीं जी हिंसाशक्तीच्या विरोधी आहे व दंडशक्तीहून हि भिन्न आहे अशी तिसरी शक्ति. एक हिंसा शक्ति दुसरी दंडशक्ति व तिसरी ही आमची शक्ति. ही तिसरी शक्ति आम्ही व्यापक बनवूं इच्छितों. त्या साठीं आपल्याला संप्रदाय बनवून चालणार नाहीं. सर्वांत मिसळावें लागेल, व केवळ मानव बनून काम करावें लागेल.

आपणां सर्वांस माझे प्रणाम !

प्रवचन २ रें

# दोन प्रश्न : (१) सरकार व सर्वोदय-समाज
# (२) भूदान-यज्ञाची व्यूहरचना

## प्रास्ताविक

आज तीन विषयांवर मीं आपले विचार तुमच्या समोर मांडण्याचें योजिलें आहे. एक म्हणजे आम्ही जे सर्वोदय-समाजाचे सेवक आहों त्यांची सरकारी योजनांबाबत अथवा वेगवेगळ्या राजकीय पक्षांबाबत दृष्टि काय असावी, दुसरा विषय भूदान-यज्ञाचें काम पुढें नेण्यासाठीं व्यवस्था कशी करावी, आणि तिसरा विषय अंतः परीक्षण. अंतः परीक्षण करून ज्या उणिवा आणि दोष आमच्यांत दिसून येतात त्यांची थोडी चर्चा करून घ्यावी म्हणजे त्या दोषांचें शोधन होईल असा माझा विचार आहे. हा जो तिसरा विषय आहे तो जरा गंभीर आहे; म्हणून त्याची चर्चा या व्याख्यानांत न करतां संध्याकाळीं जें शेवटचें व्याख्यान व्हायचें आहे त्यासाठीं तो विषय मी राखून ठेवला आहे.

## मुक्त चिंतनाचा माझा स्वभाव

भूदान-यज्ञावर मी बोलतों तेव्हा त्या कामाला चालना देण्यासाठीं जेवढें सांगावें लागेल तेवढें च सांगून मी संतोष मानीत नाहीं, तर ज्याला 'सर्वोदय-विचार' म्हणतात, ज्यांत जीवनाची एक स्वयंपूर्ण आणि विधायक

दृष्टि आहे, तो मी समजावून सांगतों, आणि त्यांत जे नाना विषय येतात त्यांची हि चर्चा करून घेतों. कधीं कधीं तर असें हि होतें कीं सबंध व्याख्यानांत भूदानाचा फारच थोडा उल्लेख येतो आणि त्याच्या आजूबाजूची भूमिका लोकांच्या समोर मांडण्याची च अधिक गरज असते. आणि तसें च मी करतों. केव्हां केव्हां लोक वेगवेगळे प्रश्न विचारतात त्यांचीं हि उत्तरें देतों. अशा प्रकारें, ज्याला मुक्त ज्ञानप्रचार म्हणतात तो च मी करीत असतों. वास्तविक माझी दृष्टि हि एखाद्या विशिष्ट कार्यावर नजर ठेवून विचार करण्याऐवजीं मुक्त चिंतन करण्याची आहे, आणि तें च मला जमते हि. पण एक काम घेऊन मी फिरत आहें हें मी विसरूं शकत नाहीं. म्हणून कांहीं विषय-मर्यादा, चिंतन-मर्यादा हि असते च, तथापि माझा स्वभाव मर्यादित चिंतन करण्याचा नाहीं, तो प्रगट होतो च.

## राजकीय पक्ष आणि आमची दृष्टि.

तेव्हां लोक तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारतात; मुख्यतः 'कम्युनिटी प्रॉजेक्ट' किंवा 'नॅशनल प्लॅनिंग'ची योजना अथवा ज्याला आपण आयडिऑलॉजी —त्या त्या पक्षांचे विशिष्ट सिद्धांत—म्हणतों त्या सर्वांच्या बाबतींत प्रश्न विचारण्यांत येतात आणि मी त्यांचीं उत्तरें देतों. तेव्हां एक जण माझ्या उत्तर देण्याच्या तऱ्हे बद्दल म्हणाला "निरनिराळ्या पक्षांच्या आणि सरकारच्या योजनांशीं अधिकांत अधिक सहकार कसा देतां येईल याचा च जो तुमचा प्रयत्न दिसून येतो तो मनाला पटत नाहीं. या उलट आपले विचार त्यांच्याहून कसे वेगळे आहेत, आणि कांहीं अंशीं तर विरुद्ध हि आहेत, हें च लोकांना अधिक स्पष्ट करून सांगण्याची गरज आहे." असा आक्षेप किंवा प्रश्न म्हणा, एका सर्वोदयाच्या चाहत्याने उपस्थित केला आहे. या निमित्तानें माझ्या सगळ्या चिंतनाच्या मागें माझी जी एक दृष्टि आहे ती सर्वोदय-संमेलनांत च मांडावी असा मीं विचार केला.

## सरकारच्या व आमच्या दृष्टींत च फरक

प्रथम सरकारची योजना हातीं घेतों. त्या योजनेवर आमचा मुख्य आक्षेप हा आहे कीं त्यांच्या व आमच्या दृष्टींत च फरक आहे. या एका आक्षेपाच्या पोटांत बाकीचे सगळे आक्षेप येऊन जातात या मुख्य मुद्याचें विश्लेषण प्लॅनिंग कमिशनच्या समोर जितक्या स्पष्टपणें मला ठेवतां आलें तितकें मी मागें च ठेवलें आहे; आणि त्यांनीं माझे विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. आणि आतां प्लॅनिंग कमिशनचा जो नवा रिपोर्ट तयार झाला आहे--जो अजून सरकार अखेरचा म्हणत नाहीं--त्यांत पहिल्या रिपोर्टाच्या मानानें पुष्कळ सुधारणा केलेल्या आहेत हें कबूल केलें पाहिजे. तरी देखील जेथें दृष्टींत च फरक आहे तेथें आमच्या व त्यांच्या योजनांमध्यें महदंतर पडतें. तथापि आमच्या दृष्टिभेदाच्या तपशिलाचा मी वारंवार उच्चार करीत बसत नाहीं. कोणी प्रश्न विचारला च तर एवढा खुलासा करीत असतों.

## सहकार करण्यामागील आमची भूमिका.

एकंदरींत सरकारी योजनांबाबत माझी सहानुभूति दिसून येते असा जो लोकांना भास होतो तो बरोबर हि आहे; कारण बुद्धिभेद निर्माण करून एखादी गोष्ट बिघडविण्यास आपण कारण व्हावें अशी माझी इच्छा नाहीं. सरकारी योजना विफल वा अयशस्वी करण्याचें मनांत आणल्यास तसें करण्याची शक्ति आज आपल्यापाशीं आहे. पण ही कांहीं मोठी शक्ति नव्हे. आपली योजना लोकांपुढें ठेवून तिची अंमल बजावणी करण्यास त्यांस राजी करून घेण्याइतकी शक्ति मात्र आपल्या जवळ नाहीं. त्या च प्रमाणें आपला कार्यक्रम लोकांपुढें ठेवून आपण निवडून येऊं आणि आपलें सरकार बनवूं शकूं ही हि शक्ति आज आपल्यापाशीं नाहीं. अशा स्थितींत एखादी गोष्ट बिघडविण्याची जी शक्ति आपल्याजवळ आहे तिचा उपयोग करून लोकांत अश्रद्धा आणि बुद्धिभेद निर्माण व्हावा आणि त्या योजनेंत जें कांहीं चांगलें

आहे त्याची हि अंमलबजावणी होऊं नये हें मी अहिंसेच्या दृष्टीनें योग्य समजत नाहीं. दंडशक्तीवर आधारलेलें आणि प्रचलित परिस्थितीच्या फार पुढें जाऊं न शकणारें सरकार जी योजना करील ती आमच्या योजनांशीं फारशीं अनुकूल असणार नाहीं. आणि ही स्थिति नेहमीं च असणार. अशा स्थितींत त्या योजनेंत जो चांगला भाग असेल त्या बद्दल अनुमति व्यक्त करणें आणि त्यावर जनतेची श्रध्दा टिकविण्याचा प्रयत्न करणें हें अहिंसक विचारक या नात्यानें मीं आपलें कर्तव्य समजतों. नाहीं तर आपण नुसतें खंडन च करीत गेलों तर त्याचा परिणाम असा होईल कीं आज लोकांत उत्साहाची अत्यंत उणीव आहे, आळस आहे, अश्रद्धा आहे, त्यामुळें सरकारनें सादर केलेल्या योजनेची अंमलबजावणी लोक करणार नाहींत. त्यांत आमचा लाभ काय होणार ? आमचा लाभ तेव्हां च होईल जेव्हां आमची योजना चालेल. म्हणून आम्ही आमची योजना लोकांपुढें ठेवीत रहावें आणि त्या बरोबर च सरकारी योजनेंत जो चांगला अंश आढळेल त्याला आपली अनुमति हि देत जावें हें च मी योग्य समजतों.

## हेतू बद्दल शंका नको.

दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हां आपण एखाद्या गोष्टीचें खंडन करायला लागतों तेव्हां आपण समोरच्याच्या हेतूबद्दल हि शंका घेत असतों. हा मी अन्याय मानतों. मी जेव्हां त्याच्या हेतूबद्दल शंका घेतों तेव्हां माझ्या हेतूबद्दल शंका घेण्याचा अधिकार मी त्याला देत असतों. अशा प्रकारें एक अधिकार दुसऱ्याच्या हातीं देणें मी आपल्या हिताचें समजत नाहीं. माझ्या हेतूंवर त्याचा विश्वास असला पाहिजे. तसा त्याच्या हेतूंवर माझा हि विश्वास असला पाहिजे असें मला वाटतें.

## मौलिक भेद

आजच्या सरकावर भांडवलशाहीची छाप बरी च आहे. हें मी

जाणतों, मानतों आणि केव्हां केव्हां बोलून हि दाखवितों. पण म्हणून सरकारला भांडवलशाही हवी आहे असा त्याचा अर्थ नव्हे. सरकार आपल्याला कांहींसे अगतिक समजतें आणि चालू परिस्थितींत भांडवलदारांच्या बुद्धीचा आणि शक्तीचा उपयोग करून घेऊं इच्छितें हें त्याचें कारण आहे. त्यांचे विचार हि कांहीं प्रमाणांत ह्याला अनुकूल आहेत. हें मी चालू सरकार बद्दल च म्हणतों असें नव्हे तर कम्युनिस्टांबाबत हि हें च म्हणतों. आमच्या योजनेंत उत्पादनाचें आणि वितरणाचें हि विकेंद्रीकरण आहे. परंतु कम्युनिस्टांना उत्पादनांत विकेंद्रीकरण अभिप्रेत नाहीं. जे आपल्याला लेफ्टिस्ट म्हणजे प्रगतिवादी मानतात त्यांच्यांत आणि भांडवल वाद्यांत या बाबतींत फारसा फरक नाहीं. उत्पादन केंद्रित पद्धतीनें करण्यांत यावें आणि मोठमोठ्या यंत्रांच्या सहाय्यानें करण्यांत यावें असें दोघे हि मानतात. म्हणून लेफ्टिस्ट एका अर्थानें पूंजीवादी आहेत असें हि म्हणतां येईल आणि त्या अर्थानें कम्युनिस्ट देखील पूंजीवादी च आहेत. कम्युनिस्ट व पूंजीवादी या दोघांत फरक वितरणाच्या मुद्यावर आहे. परंतु या दोघांच्या आणि आमच्यामध्यें संपत्तीच्या वितरणाबाबत त्या च प्रमाणें उत्पादनाच्या प्रकारांबाबत हि फरक आहे. म्हणून आम्ही च एक असें आहोंत कीं जे पूंजीवादाला कुठल्या हि प्रकारें मान्यता देत नाहीं. चालू सरकार व कम्युनिस्ट यांच्या आमच्यामधील हा असा फरक आहे. या दृष्टीनें विचार केला म्हणजे त्यांच्या हेतूं विषयीं आपल्याला संशय घेतां येत नाहीं, उलट विचारांची सफाई होऊन जाते. ज्या विचार सरणींत आणि ज्या परिस्थितींत ते आहेत त्या विचारसरणींत आणि परिस्थितींत आपण असतों तर कसें वागलों असतों याचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां असें दिसून येते कीं आपण देखील जवळ जवळ ते वागताहेत तस च वागलों असतों. हा माझा चालू सरकार बाबतचा सर्व साधारण दृष्टिकोण आहे. पण ह्या बरोबर च माझ्या परवांच्या व्याख्यानांतून मीं हें हि स्पष्ट केलें आहे. कीं आमच्या दृष्टी समोर एक निश्चित मार्ग आहे आणि आमची

पावलें त्या च मार्गावर पडलीं पाहिजेत.

## सरकारशीं सहकार कसा व किती.

लोक मला विचारतात, ‘सरकारी योजनेंत आम्ही सहकार कुठपर्यंत करावा आणि सहकार वृत्ति कुठपर्यंत राखावी. ?’ मी म्हणतों, त्यांची जी योजना आम्हांला मान्य असेल आणि सर्व-मान्य हि असेल, तिच्याशीं सहकार करायला आम्हांला कांहीं च हरकत नाहीं; पण कोणत्या हि स्थितींत स्वतःला आम्हीं मोकळें राखलें पाहिजे. आमचा एखादा ‘कॉम्युनिटी प्रॉजेक्ट’ चालू झाला आहे आणि त्यांत आम्ही अडकलों आहोंत अशी स्थिति निर्माण होता कामा नये. आमचीं सल्ला मसलत त्यांना जी पाहिजे असेल ती मिळेल च, जी कांहीं नैमित्तिक मदत त्यांना हवी असेल ती हि देतां येईल पण त्यांच्या एखादा प्रॉजेक्टची जबाबदारी च जर आपण उचलूं तर मला वाटतें आपण चूक करूं. पण आमच्या सर्वोदय-समाजांतल्या मंडळींत कांहीं लोक असे आहेत——आणि तें ठीक हि आहे, कारण सर्वोदय-समाज हा एक मुक्त समाज आहे. त्यांतील प्रत्येक मनुष्य स्वतंत्र विचार करूं शकतो——कीं जे कॉम्युनिटी प्रॉजेक्ट एकंदरींत चांगला मानून हातीं घेतात; दुसरे कित्येक तो देशाचे साफ वाटोळें करणारा आहे असें म्हणून त्याचा तिरस्कार करतात आणि तिसरे कांहीं म्हणतात कीं सरकारच्या प्रॉजेक्टमध्यें कांहीं चांगलें कांहीं वाईट असें असलें तरी सरकार जर तसला कॉम्युनिटी प्रॉजेक्ट चालविण्यासाठीं आम्हांला बोलावीत असेल तर सरकावर कांहीं अटी आपण घालाव्यात आणि त्या जर त्यानें मान्य केल्या तर आपण हि आपल्या पद्धतीनें प्रॉजेक्टचें काम करावें.

अशा ह्या तीन दृष्टि आहेत. पण माझी वृत्ति “हाथी चलत है अपनी गत में” अशा सारखी आहे. या उक्तीचा जो उत्तरार्ध आहे तो उच्चारण्याचा अधिकार कवीचा आहे; माझा नव्हे. जेवढ्याचा उच्चार मीं केला तेवढा च अधिकार माझा आहे. तेव्हां हत्ती आपल्या गतीनें चालेल

202483 वि: [illegible]
[illegible] ...९०.३.५८... नों: दि: [illegible]

आणि आपलें च काम करीत राहील, अष्टौ प्रहर आपलें सारें चिंतन आपल्या विचारांना पुढे रेटण्याच्या कामीं वेंचील. दुसऱ्याचें खंडन करण्याच्या भानगडींत आपण पडतों तेव्हां रचनात्मक कार्यांत आपली शक्ति कमी पडते; याला मी शक्तिक्षय म्हणतों; म्हणून हि मी खंडनांत पडत नाहीं. आणि माझा असा अभिप्राय आहे कीं आपल्या मंडळींनीं हि खंडनांत पडूं नये. अेकीकडे आम्ही सरकारचें खंडन करतों आणि दुसरीकडे त्याच्या योजनेंत अडकतों, हे दोन्ही प्रकार चुकीचे आहेत. दोहोंमुळें आमचें नुकसान च होआील असें मला वाटतें.

## पक्षभेद मिटविण्याचा उपाय– सर्वमान्य कार्यक्रम

या च संबंधीं आणखी अेक प्रश्न आहे. हे जे वेगवेगळे राजकीय पक्ष आहेत त्यांच्या विषयीं आमची वृत्ति काय असावी ? माझा प्रयत्न तर हे सारे वेगवेगळे राजकीय पक्ष नाहींसे व्हावेत असा आहे. मीं प्रयत्न करून हि ते राहिले तर राहोत बापडे, पण माझी खटपट अशी राहील कीं अेक सर्वमान्य कार्यक्रम लोकांपुढे ठेवावा आणि तो पार पाडण्याठीं सर्वांनीं पक्षभेद विसरून आपला पूर्ण सहकार द्यावा. त्या योगें आज जे पक्षभेद आहेत ते कमी होतील आणि मतैक्य बरें च वाढेल. आतां तर प्रत्यक्ष असें एक कार्य लाभलें आहे कीं ज्यामुळें देश प्रगति करीत आहे, जनशक्ति वाढत आहे, आणि सगळे लोक त्यांत भाग घेत आहेत. तेव्हां पुढे १९५७ मध्यें जी निवडणूक होणार आहे तींत अेका सज्जना विरुद्ध दुसरा सज्जन असें दृश्य दिसतां कामा नये.

## सज्जना सज्जनांत सामना नको

आज तर कौरव-पांडव असें चाललें आहे. कौरवांच्या पक्षांत कांहीं चांगले लोक आहेत तर पांडवांच्या पक्षांत हि कांहीं वाअीट लोक आहेत.

दोन्ही पक्षांत बरे वाअीट लोक आहेत आणि अेका सज्जना विरुद्ध दुसरा सज्जन उभा आहे, ही स्थिति कां निर्माण व्हावी ? व्हायला हें पाहिजे कीं सारे सज्जन अेका बाजूला आणि सारे दुर्जन दुसऱ्या बाजूला; सज्जनता विरुद्ध दुर्जनता असा च सामना कां होऊं नये ?

## भारतीय लोकसत्ता : पांचामुखी परमेश्वर

परंतु पाश्चात्यांकडून एक लोकसत्ता येथें आली आहे, जी म्हणते कीं दोन पक्ष असले च पाहिजेत, म्हणजे त्यांच्या सहयोगी संघर्षामुळें राष्ट्र योग्य मार्गावर राहतें; दोषांचें शोधन होतें, इत्यादि. या विचारांत कांहीं गुण आहेत हें मला मान्य आहे. पण त्यांतून कांहीं दोष निर्माण होतात. त्यांचें निराकरण आपल्याला केलें पाहिजे. म्हणून मी नेहमीं म्हणत असतों कीं हिंदुस्थानचा राजकीय अनुभव त्याच्या ग्रामपंचायतींत सांठविलेला आहे. 'पांचामुखी परमेश्वर' हें ग्रामपंचायतीचें ब्रीद आहे. पांचामुखी परमेश्वर म्हणजे एकामुखी दोनमुखी तर नाहीं च पण तीन मुखी किंवा चार मुखी परमेश्वर देखील नाहीं. आजच्या राजकारणाला बहुमताचा कायदा मान्य आहे. परंतु आम्ही असें मानलें होतें की सगळ्या पंचांचें एक मत झालें पाहिजे. पांची पंचांचें एक मत झालें म्हणजे च कुठला हि ठराव पास व्हावयाचा. याला च मी पांचामुखीं परमेश्वर म्हणतों. या विचाराला अनुसरून जर आपण काम करणार नाहीं, तर सगळ्या जगांत आज जो बहुमत विरुद्ध अल्पमत असा संघर्ष आहे तो मिटणार नाहीं.

## ज्यावर एक मत तो च क्रियेचा विषय असला पाहिजे.

सर्व मिळून देशाचा विचार शुद्ध कसा होईल याचा प्रयत्न व्हावयास पाहिजे. देशांत जे वेगवेगळे विचार आहेत त्यांच्यांत कांहीं समान अंश असेल च. आणि भिन्न भिन्न विचारांत हि पुष्कळ अंश समान असतो. कारण

सज्जनांच्या विचारांत जे मतभेद असतात ते बरे च गौण असतात आणि मुळांत पुष्कळ च एकता असते. म्हणून अशा समान अंशाला अनुसरून च एक कार्यक्रम आखला पाहिजे. आणि विचारांतील जो भिन्न अंश असेल तो चर्चेचा विषय व्हावयास पाहिजे. क्रियेचा होता कामा नये. भावार्थ असा कीं जो पर्यंत सज्जनांमध्यें एखाद्या विषयावर मतभेद असेल तो पर्यंत चार विरुद्ध पांच असा निर्णय करून त्या विषयाची अंमलबजावणी करणें मी चूक समजतों. माझ्यामतें असा विषय अंमलबजावणीला अपात्र समजून त्या बाबत चिंतन व चर्चा व्हायला पाहिजे आणि ज्या विषयीं मतभेद उरला नाहीं; त्याची च अंमल बजावणी व्हायला पाहिजे.

आतां सज्जन कुणाला म्हणावे कुणाला म्हणूं नये इत्यादि चर्चा निघू शकते, पण त्यांत मला पडायचे नाहीं. तो आतांचा विषय हि नाहीं. परंतु माझें म्हणणें हें आहे कीं हे जे वेगवेगळे पक्ष आहेत त्यांच्यांतील भिन्नता दूर करण्याच्या कामीं आपण पुरुषार्थ दाखविला पाहिजे, आणि गीतेनें हें च सांगितलें आहे कीं हे जे वरवरचे भेद दिसतात ते मिथ्या आहेत, त्यांच्य मुळाशी कांहीं एक विशेष वस्तु असते ती आपण ओळखली पाहिजे, तेव्हां च ऐक्याची भूमिका निर्माण होते. एरव्ही दुनियेंत भिन्न विचार रहाणार च आहेत. परंतु भिन्न विचार विचारांत च रहावेत. हा एक तत्त्वज्ञानाचा सिद्धांत आमच्या शास्त्रकारांनीं मानला आहे. तुम्ही पाहिलें असेल कीं हिन्दुधर्मांत किती तरी दर्शनें आहेत, कांहीं आस्तिक दर्शनें आहेत कांहीं नास्तिक दर्शनें हि आहेत आणि एकंदरीत पाहतां कोणतें हि दर्शन हिन्दुधर्मांत पचून जाते. एकमेका विरुद्ध तीं खूप तीव्रतेनें हि बोलतात. संस्कृतांत जितकें विचार-स्वातंत्र्य मीं पाहिलें तितकें अन्य कोणत्या हि साहित्यांत मला आढळलें नाहीं. एकमेकांच्या विचारावर जेव्हां प्रत्यक्ष प्रहार केला जातो तेव्हां ती एक पाहण्यासारखी वस्तु असते. रामानुज आणि शंकर यांच्या विचारांतील भेद दोघे एकमेकांच्या विरुद्ध व्यक्त हि करतील आणि त्याची चर्चा चिंतन

हि करतील, परंतु ज्याला आचरण शास्त्र म्हणतात त्या बाबत त्यांचा कुठें मतभेद नाहीं. सत्य दोघे मानतात, अहिंसा दोघे मानतात, सदाचार दोघे मानतात; कांहीं विधि दोघे मानतात कांहीं निषेध दोघे मानतात; आणि त्याला धर्म म्हणतात. रामानुजाच्या राज्यांत सकाळीं उठायला पाहिजे आणि शंकराच्या राज्यांत सकाळीं उठता कामा नये असें नाहीं. अशा प्रकारें जें आचरणाचें क्षेत्र आहे त्यांत जर आपण ऐक्याचा आधारें आगे कूच करूं तर देशाची प्रगति होईल आणि समाजास स्थिरता लाभेल. विचार भेदाचा जो विषय असेल त्या बाबत आपण चर्चा करावी, करतां येईल तितका सूक्ष्म उहापोह करावा, जो पर्यंत माझा विचार तुम्हांला पटला नाहीं तो पर्यंत मीं तुम्हांला तो समजावून देत रहावे आणि जो पर्यंत तुम्हांला तो पटत नाहीं तो पर्यंत तुम्ही तो मानूं नये हें सारें व्हायला पाहिजे; अगदीं मोकळेपणानें व्हायला पाहिजे. परंतु जेव्हां एखादा कार्यक्रम नक्की करायचा असेल तेव्हां ज्या बाबत सर्व सज्जनांचें एक मत आहे असा च नक्की केला पाहिजे.

बंधूंनो, सरकारी योजनांच्या विषयीं आणि वेगवेगळ्या पक्षांच्या विषयीं आपला दृष्टिकोण काय असावा हा एक विषय तर इथें मीं पूर्ण केला.

## भूदान-यज्ञाची व्यूह-रचना

आतां दुसरी गोष्ट ही कीं आपल्या संघाची व्यूहरचना कशी असली पाहिजे. ह्या कामाची सुरुवात तेलंगणांत सुमारें दोन वर्षांपूर्वी झाली. ज्या गांवांत ही सुरुवात झाली त्या गांवचे गृहस्थ आज या संमेलनांत हजर आहेत. पहिल्या च दिवशीं त्यांनीं आम्हांला दान दिलें. हरिजनांनीं ८० एकर जमीन मागितली, त्यांनीं १०० एकर दिली. ह्या गृहस्थांना तुम्ही भेटूं शकता आणि त्यांच्या गांवांतील वातावरणांत ही गोष्ट कशी घडली त्या संबंधीं विचारूं शकतां.

### भूदान-यज्ञ ईश्वराची प्रेरणा

त्या दिवशीं ईश्वराचा एक संकेत मला मिळाला व काय केलें पाहिजे याचा मीं विचार करूं लागलों. ईश्वराचा तसा संकेत मिळाला नसता आणि मी स्वतंत्र बुद्धीनें विचार केला असता, तर दान मागून जमिनीचा प्रश्न सोडविण्याची कल्पना मला सुचली च नसती. मंदिरें, मशिदी, मठ इत्यादींसाठीं शे-दीडशें किंवा हजार-पांचशें एकर जमिनीचें दान मिळूं शकतें, पूर्वी लोकांनीं मिळविलें हि आहे, आणि आम्ही तसें मिळवायचें म्हटलें असतें तर मिळवूं शकलों असतों पण जमिनीचा प्रश्न सोडविण्यांत कोडो एकरांचा प्रश्न येतो. आणि इतकी जमीन लोकांची सद्बुद्धि जागृत करून स्वतंत्र रीतीनें प्राप्त करण्याची हिंमत मला झाली नसती पण जेव्हां मला तो संकेत मिळाला तेव्हां मीं विचार केला कीं जरी हें काम माझ्या बुद्धीला फार च कठिण वाटत आहे, तरी ईश्वरी संकेत मिळाल्यानंतर हि जर मी तें हातीं घेणार नाहीं, तर अहिंसा भित्री ठरेल आणि कार्यकारी होणार नाहीं. म्हणून काम किती हि कठिण असलें तरी ईश्वरावर भरंवसा ठेवून मीं तें हातीं घेतलें. पाहिजे. त्यावेळीं मी माझ्या साथीदारांशीं विचार विनिमय केला नाहीं, कारण मला माहीत होतें कीं विचार विनिमय केला असता तर कोणी हि, हें काम हातीं घ्या; अशी सल्ला मला दिली नसती. ते असें च म्हणते कीं ही होण्यासारखी गोष्ट नाहीं. एखाद्या गांवांत घडली ही गोष्ट वेगळी, परंतु सर्व देशासाठीं हा कार्यक्रम व्यवहार्य होऊं शकणार नाहीं, असा च अभिप्राय माझ्या अगदीं निकटवर्ती लोकांचा हि पडला असता हें मी जाणून होतों. आणि माझा हि अभिप्राय तसा च असता. जो संकेत मला मिळाला तो मला न मिळता दुसऱ्या कोणाला मिळाला असता आणि त्यानें मला विचारलें असतें तर मीं हि हें च सांगितलें असतें कीं, "अरे बाबा ! एखाद्या गांवांत ही गोष्ट घडली तेवढ्यानें या विषयींचा सर्रास कार्यक्रम आपल्याला ठरवितां येणार नाहीं; आणि तसा संकल्प हि मनांत करतां येणार नाहीं." म्हणून

कोणाचा सल्ला विचारणें मला योग्य किंवा उपयुक्त वाटलें नाहीं, आणि मीं नशीब अजमावून पाहण्याचें ठरविलें व देवावर भरंवसा ठेवून मागायला सुरुवात केली. मागतां मागतां ह्या वस्तूच्या पुढें-मागें, वर-खालीं, कोणकोणते भाव दडलेले आहेत त्याचें नवें नवें दर्शन मला प्रत्यही घडूं लागलें, त्या वेळचीं माझीं भाषणें वाचल्यास आढळून येईल कीं प्रत्येक भाषणांत मीं कांहीं ना कांहीं नवीन वस्तु सांगितलेली आहे. अशा रीतीनें हा विषय उत्तरोत्तर स्पष्ट होत गेला. जमीन मिळत गेली व तेलंगणांत एक दर्शन झालें. तरी हि मनांत स्वाभाविकपणें शंका राहिली कीं येथें एक प्रकारची पृष्ठ-भूमि तयार होती म्हणून जमलें. पण देशाच्या दुसऱ्या भागांत कदाचित् जमणार नाहीं. ही शंका माझ्या मनांत जरी फारशी नव्हती, तरी दुसऱ्यांच्या मनांत ती पुष्कळ प्रमाणांत होती.

## भूदान-यज्ञाचा विकास

थोडया च दिवसांत दिल्लीला जाण्याची संधि आली. पं. नेहरूंचें निमंत्रण तावडतोब येण्याचें होतें म्हणून लगेच निघण्याचें कबूल केलें परंतु माझ्या पद्धतीनें पायीं जाण्याचें ठरविलें. रस्त्यानें जातांना लोकांना मी ही गोष्ट समजावीत गेलों. परिणाम असा दिसून आला कीं तेलंगणांत जो उत्साह मला दिसला तो च दिल्ली पर्यंत हि लोकांनीं दाखविला. ह्या वरून एक गोष्ट स्पष्ट झाली कीं ही वस्तु खास तेलंगणाची नसून आजच्या युगाची आहे. म्हणजे काळाचा प्रवाह या कार्याला अनुकूल आहे. अशा रीतीनें जी काय जमीन मिळाली ती मी घेत गेलों.

## उत्तर प्रदेशांतील अनुभव

पुढें उत्तर प्रदेशांत फिरण्याचा प्रश्न आला. तेव्हां मी एक कोटा निश्चित केला व तेवढ्याचा संकल्प केला. तो संकल्प होता छोटासा च पण

तो डोळ्यासमोर ठेवून काम सुरूं केलें. उत्तर प्रदेशांतील सहकाऱ्यांनीं, संख्येनें कमी असून हि पुष्कळ बहादुरीनें काम केलें, व सतत दहा महिने माझ्या मागें पुढें धावले. त्यांतील कांहींनीं विशेष जबाबदारी उचलली. त्या लोकांच्या सहकार्यानें असें दिसून आलें कीं संकल्प सिद्ध होऊं शकतो. आज च संमेलनांत त्या मंडळींनीं जाहीर केलें आहे कीं त्यांचा संकल्प जवळ जवळ पुरा झाला आहे. संकल्प पांच लाखांचा होता. पावणेपांच लाख प्रत्यक्ष झाले आहेत व पंचवीस हजार ते करूं शकणार आहेत. एवढें च नव्हे तर त्यांनीं पुढील वर्षा अखेर एकून ११ लाख एकर जमा करण्याचा निश्चय केला आहे. त्यांनीं आपला निश्चय येथें जाहीर हि केला आहे. त्यांनीं आपसांत एकत्र बसून गंभीरपणें ईश्वर-स्मरण पूर्वक हा संकल्प केला आहे.

## चळवळ व्यापक करण्याबावत विचार

ही झाली उत्तर प्रदेशाची हकीकत. पण पुढें माझ्या मनांत असा विचार आला कीं अशा प्रकारें मी सर्व हिन्दुस्थानभर फिरत राहिलों तर वर्षाला मला दोन-तीन लाख एकर जमीन मिळेल व सर्व हिन्दुस्थान फिरण्यास पांच सहा वर्षें लागलीं समजा तर दहा-बीस लाख एकर जमीन मी मिळवूं शकेन. पण एवढ्यानें प्रश्न सुटणार नाहीं. आणि एका निश्चित मुदतींत आपण तो सोडवूं शकलों नाहीं तर जमाना आपल्यासाठीं थांबणार नाहीं. त्याची गति आज पूर्वीं प्रमाणें मंद नसून तेज आहे. आपला हा कार्यक्रम आपण शंभर वर्षें चालविला तर तें ठीक होणार नाहीं. तें लोकोपकाराचें एक साधन होईल, पण समाज—रचना बदलण्याचें साधन बनूं शकणार नाहीं. म्हणून कोठें तरी तो प्रश्न पूर्ण सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## भगवान बुद्धाची भूमिः बिहार

म्हणून मला असें वाटलें कीं बिहार प्रांत असा आहे कीं जो फार

मोठा हि नाहीं व लहान हि नाहीं. ह्या प्रांतांत सद्भावनेचा अंश इतर प्रांतांपेक्षां अधिक नसला तरी कमी तर नाहीं च. आणि माझी श्रद्धा मला सांगत होती कीं जेथून भगवान् बुद्धानें सर्व दुनियेला अहिंसेचा संदेश दिला त्या भूमींत अहिंसेच्या चळवळीला विशेष अनुकूलता असली पाहिजे. म्हणून बिहारचें च काम हातीं घ्यावें, व निश्चय करावा कीं येथला प्रश्न सोडवून च मग पुढें जावें. बिहारमध्यें ज्या दिवशीं प्रवेश केला त्या दिवशीं हा निश्चय मीं जाहीर हि करून टाकला. पण बिहारमध्यें प्रवेश केल्या बरोबर अनुभव वेगळा आला, इथें चांगला च खडक लागला. पण मीं विचार केला कीं, जिथें खडक लागतो तिथें मेहनत जास्त लागत असली तरी एकदां तो फुटला कीं खालून पाण्याचा सुंदर जिवंत झरा लागतो. आणि खडकाखालून येणारें पाणी फार स्वच्छ व साफ असतें. म्हणून मेहनत फार पडली तरी ह्या प्रांतांत काम निर्मळ होईल. असा विचार करून ठरविलें कीं 'अस्तीत्येव उपलब्धव्यः' हें उपनिषद्वचन सांगतें कीं 'अस्ति'- होणार आहे—अशी भाषा बोलत चला. 'नास्ति' चें नांव काढूं नका. सारांश माझ्या मनांत असें कधीं च आलें नाहीं कीं मीं संकल्प तर केला, पण काम फार कठिण दिसतें. बिहार-मध्यें पहिल्या दोन महिन्यांत दान फार कमी मिळालें. त्यामुळें सर्व हिन्दुस्थानभर अशी छाप पडली कीं बिहारचें काम फार बिकट दिसतें. उत्तर प्रदेशांत कामाची गति शेंवटीं शेंवटीं फार वाढलेली होती. ती च गति बिहारमध्यें चालू राहील इतकें च नव्हे तर अधिक वाढेल अशी अपेक्षा होती. पण तसें झालें नाहीं. आमचे राष्ट्रपति सारण जिल्ह्याचे रहिवाशी. त्यांनीं ह्या कार्याला चांगली मदत करावी असें आपल्या सहीनिशी जाहीर पत्रक हि काढलें त्याच्या हजारों प्रति वाटल्या गेल्या. पण इतकें सर्व असून पंधरा दिवसांत मला त्या जिल्ह्यांतून मोठ्या मुष्किलीनें एक हजार एकर जमीन मिळाली. कांहीं दिवस तर असे हि गेले कीं दोन च एकर जमीन मिळाली ज्या दिवशीं दोन तीन च एकर जमीन मिळाली त्या दिवशीं मीं कार्यकर्त्यांना थोडें दाटलें

त्यांनीं कामाची गति थोडी वाढविली. आरंभींचा असा अनुभव घेत असतांना माझा गया जिल्हयांत प्रवेश झाला. पहिल्या दिवशीं जिथें मुक्काम झाला तें एक छोटेंसें खेडें होतें. रात्रीं मला बहुधा पडतांच झोंप येते. त्या दिवशीं झोंप तर लवकर आली पण उडून हि लवकर गेली. रात्रीं एकाचा सुमार असेल. मी विचार करूं लागलों. गया जिल्हा भगवान् बुद्धाच्या तपस्येचा जिल्हा असून, करोडो हिन्दु लोक येथें श्राद्ध करण्यासाठीं येत असल्यामुळें तो श्रद्धा-स्थान हि आहे. श्राद्धाचा अर्थ च श्रद्धेचें स्थान असा होतो. म्हणजे साऱ्या हिन्दुधर्माच्या श्रद्धेचें आणि बुद्धधर्माच्या उदयाचें हें स्थान आहे. ही गोष्ट कांही लहान सहान नाहीं. तर पाहिला हप्ता म्हणून येथें एक लाखाचा संकल्प करावा अशी कल्पना मला सुचली. उठल्यानंतर दुसऱ्या गांवीं पोहोंचतां च माझ्या बरोबरच्या सहकाऱ्यांसमोर ही गोष्ट मीं ठेवली, व त्यांनीं ती उचलून धरली. आतां पर्यंत काय काम झालें तें जाहीर आहे च, चार लाखाचा कोटा ठरला. येथल्या काँग्रेसवाल्यांनीं त्याची जबाबदारी घेतली. ह्या वर हि टीका होत आहे. लोक म्हणतात 'आतां भूदान कोणत्या दिशेनें चाललें' काँग्रेसवाल्यांनीं तें स्वीकारलें म्हणजे बदमाशांच्या हातात ती चळवळ आतां गेली असा त्यांच्या म्हणण्याचा भाव. दुसऱ्याविषयीं असा विचार करणें म्हणजे अहिंसा न समजणें होय. ज्या कोणीं आमचा हात धरला असेल तो आमच्या च ताब्यांत आला अशी शक्ति आमच्यांत असली पाहिजे.

### भूदानाची व्यूह-रचना

आतां माझ्या मनांत जी व्यूह-रचना आहे ती अशी कीं, बिहारमध्यें अधिकांत अधिक शक्ति लावण्यांत यावी व त्यांतल्या त्यांत एक दोन जिल्हयांत सर्व शक्ति लावावी, ज्या योगें त्या जिल्ह्याचा भूमिप्रश्न सुटावा जयप्रकाशजी परवा म्हणाले कीं गया किंवा दुसऱ्या कोणत्या जिल्ह्यांत जर तीन लाख एकर भूमीचें दान मिळालें आणि कायद्याच्या मदतीशिवाय त्या

जमिनीचें वाटप झालें तर हिन्दुस्थानच्या दुसऱ्या भागांत असें न होण्याला कांहीं च कारण नाहीं. या कामीं कायद्याची जरी नाहीं, तरी सरकारी मदतीची– म्हणजे सरकारजवळ पडून असलेल्या जमिनीची– अपेक्षा राहील. साऱ्या प्रांतांत १-२ लाख एकर जमीन मिळवावयाची म्हटली तर सरकारच्या जमिनीचा प्रश्न येत नाहीं पण एखाद्या प्रांताची भूमि-समस्या संपूर्णपणें सोडवायची म्हटली आणि बत्तीस लाख, चाळीस लाख, एक करोड, अशी भाषा सुरूं झाली म्हणजे सरकारी जमीन अवश्य घ्यावी लागेल. परंतु ती सुरुवातीला घ्यायची नसून शेंवटी घ्यायची आहे. अशा रीतीनें सरकारचें हि साह्य त्यांत राहील. त्यामुळे सर्वांच्या सहकारानें कां होईना पण एखाद्या जिल्ह्यांत कायदा व दंडशक्ति यांच्या आधाराशिवाय काम पुरें व्हावें व देशापुढें एखादा नमूना ठेवतां यावा अशी माझी दृष्टि आहे. त्याचा परिणाम साऱ्या भारतवर्षावर होईल, एक निष्ठा वाढेल, आणि हें काम होऊं शकतें असा विश्वास उत्पन्न होईल.

## सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज

एकदां विश्वास उत्पन्न झाला कीं कार्यकर्ते त्या कामाला लागतील व मग प्रश्न सुटण्यास वेळ लागणार नाहीं, असा मीं विचार केला. आतां तुमच्याकडून माझी अपेक्षा अशी कीं तुम्ही प्रांतांत जाऊन सर्व कामें सोडून एक वर्षपर्यंत आपला पूर्ण वेळ ह्या कामाला द्यावा. चांगलीं कामें असलीं तरी सोडून द्या. मी हें कांही नवीन सांगत नाहीं. भक्तिमार्गाचा असा आदेश आहे कीं अधर्म तर सोडावयाचा च पण धर्म हि सोडायचा. 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज' सर्व धर्म सोडून मला शरण ये, हा आहे भक्तिमार्ग. भक्तीच्या गोष्टी करून लहान लहान धर्मांना जर अवकाश ठेवूं तर आपण निष्ठावंत होऊं शकणार नाही. आणि आपली भक्ति सफल होऊं शकणार नाही. भक्तिमार्गाची विशेषता ही कीं त्यांत सर्व धर्मांचा त्याग करावा

लागतो. आपला मार्ग हा एक भक्तिमार्ग च आहे. कारण आपण सर्व समाजाला एकरस करूं इच्छितों. ही गोष्ट भक्तीशिवाय साध्य होणार नाहीं. या कार्यानें आम्हांला प्रेमभाव उत्पन्न करावयाचा आहे, म्हणून तो च आमचा मुख्य धर्म आहे, दुसरे जे छोटे छोटे धर्म आम्हीं मानून घेतले असतील ते ह्या भक्तीसाठीं सोडावे लागणार आहेत. म्हणून आपण बाकीच्या सर्व धर्मांचा त्याग करून ह्या कामाला लागावें ही माझी मागणी आहे.

## बिहारमध्यें इतरांनीं हि वेळ द्यावा.

दुसरी गोष्ट ही कीं ह्या प्रांतांतील लोक जें काम करतील ते तर करतील च, पण दुसऱ्या हि भिन्न भिन्न प्रांतांतील लोकांनी बिहारसाठीं थोडे दिवस समजा दोन चार महिने, दिले तर तें उत्तम होईल. त्यानें दोन फायदे होतील. बिहारमध्यें आज जें दूषित वातावरण आहे, जे पक्षभेद आहेत, ते नाहींसे होण्यास मदत होईल. हे पक्षभेद नाहींसे करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. पण ते इतके खोल गेलेले आहेत कीं भगवंताच्या कृपेनें च मिटले तर मिटतील. वस्तुतः त्यांच्या मुळाशीं कांहीं च नाहीं. केवळ बालिशपणाचा प्रकार आहे, पण तो आहे. बाहेरून येणारे लोक तटस्थ असल्यामुळें हे भेद मिटण्याच्या कामीं पुष्कळ मदत होईल. दुसरा फायदा हा कीं इथल्या कामामुळें त्यांना शिक्षण मिळेल. येथें एक वातावरण आहे, त्यांत काम कसें करावें ह्याचें शिक्षण मिळेल. व आपल्या प्रांतांत गेल्यावर त्याचा त्यांना उपयोग होईल. आपल्या हातचें काम क्षीण करून लोकांनीं येथें यावें अशी माझी इच्छा नाहीं. पण एकेका प्रांतांतून लहान-मोठ्या दोन-चार कार्यकर्त्यांनीं बिहारसाठीं वेळ दिला तर फार चांगलें होईल. ही माझी दुसरी मागणी आहे.

## बिहार पासून अपेक्षा

माझी तिसरी मागणी बिहारच्या लोकांपाशीं आहे. त्यांनीं एक-दोन जिल्हे निश्चित करून त्यांत आपली मुख्य शक्ति लावावी. उरलेली इतरत्र

लावावी. असें करून दोन तीन महिन्यांत जर एखादा जिल्हा पुरा केला तर ती आनंदाची गोष्ट होईल. लोक मला विचारतात कीं तुम्ही बिहारच्या कामांत च अडकून पडलां आणि दुसऱ्या प्रांतांत जाऊं शकला नाहीं तर तें भूदान-यज्ञाच्या दृष्टीनें कितपत इष्ट होईल ? माझें त्याला उत्तर असें कीं तें इष्ट होईल, एवढें च नव्हे तर तें च इष्ट होईल. कारण त्या योगें एका निश्चित मुदतींत एका विशिष्ट स्थानीं आपण हें काम पुरें करूं शकूं. मग फक्त गणिताचा च प्रश्न राहील कीं अमुक इतके कार्यकर्ते मिळाले तर अमुक इतक्या दिवसांत साऱ्या भारताचा प्रश्न सुटेल. मग तितके कार्यकर्ते मिळाले नाहींत तर काम पूर्ण होणार नाहीं ही गोष्ट वेगळी, पण मिळाले तर पूर्ण होऊं शकतें असें दर्शन होईल, आणि याची मी आज फार गरज मानतों. मीं बिहारच्या लोकांना सांगून टाकलें आहे कीं येथील काम पूर्ण होत नाहीं तोंपर्यंत माझा मुक्काम बिहारांत च राहील. वास्तविक माझी इच्छा अशी आहे कीं ह्या पुढचें संमेलन ह्या प्रांतांत न होतां दुसऱ्या प्रांतांत व्हावें. आणि आज स्थिति अशी आहे कीं जेथं मी असेन तेथें संमेलन ठेवावें लागतें. म्हणून ह्या प्रांतांच्या लोकांनीं येथचें काम पूर्ण करून मला पुढील संमेलनासाठीं दुसऱ्या प्रांतांत पाठवावें. अर्थात् ३२ लाख एकर जमीन पुढील वर्षी मिळविण्याचा जो संकल्प आहे तो पुरा करण्याच्या कामीं आपण सर्वांनीं लागावें हें चांगलें.

### बिहारचा देशव्यापी प्रभाव

पुढच्या वर्षाच्या अखेर पर्यंत साऱ्या भारतांत २५ लाख एकर जमीन मिळविण्याचा आमचा संकल्प जाहीर च आहे. बिहारांत च जर आम्ही ३२ लाख एकर मिळविले तर आमच्या पहिल्या संकल्पांत उणेपणा थोडाच येणार आहे ! ही योजना यशस्वी झाली नाहीं तर गोष्ट वेगळी, पण जर यशस्वी झाली तर दुसऱ्या प्रांतांत पाहतां पाहतां क्रांति होईल. कांहीं विशेष करावें च

लागणार नाहीं. एकानें मला विचारलें कीं समजा, बिहारांत काम झालें, तुम्हांला पाहिजे तेवढी जमीन मिळाली, पण दुसऱ्या प्रांताच्या लोकांनीं कांहीं केलें च नाहीं तर तेथें काय होणार ? मीं त्या गृहस्थाला उत्तर दिलें कीं तुमचा प्रश्न मानस-शास्त्राच्या विरुद्ध आहे. मानस-शास्त्र तुम्ही म्हणतां त्या प्रकारें करीत नसतें. पण घटकाभर धरून चलूं कीं दुसऱ्या प्रांतांत कांहीं काम झालें नाही. तर मग तिथें दोन गोष्टी होतील. अेक तर त्या प्रांताचे लोक बंड करतील, किंवा बिहारचा प्रश्न सुटलेला पाहून तेथील सरकार कायदा करील. अशा प्रकारें अेक तर कायद्यानें काम व्हावें, काम होअील किंवा बंडानें--म्हणजे च राज्यक्रांतीनें--काम होअील. अेका प्रांतांत अेवढी मोठी घटना व्हावयाची व तिचा कांहीं हि परिणाम दुसऱ्या प्रांतावर व्हावयाचा नाहीं अितका मानव-समाज अजून छिन्न-विच्छिन्न झालेला नाहीं. उलट मानव समाजांत अेका ठिकाणची अनुभूति दुसऱ्या जागी पोंचत असते, आणि आजच्या काळीं समवेदनेची ही क्षमता बरीच अधिक आहे. हिन्दुस्थानांत व बाहेर हि.

--×--

: ३ :

# अंतर्निरीक्षण

## भूदान कार्यकर्त्यांचें अभिनंदन

गेल्या सालीं आम्ही जें काम केलें, त्या विषयीं त्या त्या प्रदेशांच्या लोकांशीं मीं चर्चा केली. चर्चेमध्यें मीं कार्यकर्त्यांना जागृत करण्यासाठीं कित्येकदां कठोर वचन हि बोललों. लोकांनीं तें सर्व प्रेमपूर्वक सहन करून घेतलें. परंतु ह्या ठिकाणीं सर्व लोकांची त्या बद्दल मी क्षमा मागतों. आपण नीट रचनापूर्वक काम केलें असतें तर गेल्या सालीं जें काम झालें, त्यापेक्षां तें अधिक झालें असतें हें खरें असलें तरी जें झालें तें कांहीं कमी नाहीं, आणि म्हणून असमाधान मानण्याची गरज नाहीं. काल वाचल्या गेलेल्या ठरावांत गेल्या सालीं सर्व देशांत मिळून सात आठ लाख एकर जमीन मिळविली गेली, ह्याच गोष्टीचा गौरवयुक्त उल्लेख आहे. ज्या लोकांनीं हें काम करण्यास मदत केली त्यांनीं खरोखर गौरव करण्यासारखी च गोष्ट केली असें मला हि वाटतें.

आतां पुढील वर्षीं आपण अधिक प्रगति करूं इच्छितों. आम्ही जो निश्चय केला आहे तो पुरा करूं इच्छितों. हें काम फारसें कठिण नाहीं. ह्या वर्षीं आम्हांला अकरा महिने च मिळाले. पुढील वर्षी तेरा महिने मिळतील. आतां कामाची योजना हि नीट झालेली आहे व लोक जागृत झालेले आहेत, यामुळें संकल्पित काम होऊन जाईल अशी मला उमेद आहे.

## आत्म-परीक्षण

पण आपलें काम ह्याहून अधिक व्यापक आहे. आपला उद्देश उच्च आहे. त्या दृष्टीनें आपल्याला अंतर्निरीक्षण करून स्वतःला त्या लायक बनविले पाहिजे. आमच्यांत जे कांहीं दोष दिसतात त्यांचें निवारण केलें पाहिजे. आम्ही सर्वोदय-समाजाचे दोष दाखवितों, तेव्हां इतरांशी तुलना करून त्यांच्याहून स्वतःला उच्च किंवा नीच मानूं इच्छीत नाहीं, तर स्वतंत्र रीतीनें आपलें च निरीक्षण करतों. जे दोष आपल्यांत आहेत ते दुसऱ्यांत हि आहेत येवढ्यानें आमचें समाधान होऊं शकत नाहीं. म्हणून तुलनेची दृष्टि न ठेवतां स्वतंत्र रीतीने च आपलें निरीक्षण आम्ही करूं इच्छितों.

## सहिष्णुतेची आवश्यकता

काल आपण पाहिलें कीं एक गृहस्थ बंगाली भाषेचा प्रश्न येथें मांडूं इच्छीत होते. ते आवेशांत कांहीं बोलून गेल्या बरोबर लोकांना धीर निघाला नाहीं व 'बसा बसा' असें ते ओरडूं लागले. लोकांनी धीर धरला असता तर त्यांचें हृदय त्यांनीं जिंकलें असतें; कारण बोलणारानें सुरवात च अशी केली कीं 'ह्या सभेंत आमचा प्रश्न मांडण्याची संधि दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहें.' यावरून ह्या सभेचा उद्देश निराळा आहे ह्याची जाणीव त्यांना होती असें स्पष्ट होतें. त्यांचा प्रश्न स्थानिक स्वरूपाचा होता आणि संमेलनाच्या भरगच्च कार्यक्रमांत त्या प्रश्नाला मांडण्याची संधि मिळणें एक विशेष गोष्ट आहे हें त्यांनी कबूल हि केलें होतें. जर आपण त्यांचें भाषण सहन करून शांत राहिलों असतों तर एका मनुष्याला आम्ही जिंकूं शकलों असतों. पण झालें उलटें च. त्यांचें मन दुखविलें गेलें. त्यांना जरी शेंवटीं बोलण्याची संधि मिळाली तरी त्यांच्या हृदयाला झालेली जखम तेवढ्यानें भरून निघाली नाही. तोडणें सोपें असतें. जोडणें कठिण असतें. शिवाय जें प्रदर्शन झालें तें सामुदायिक होतें. एखाद्या वक्त्यानें एखाद्याला अडविलें किंवा त्याच्यावर

टीका केली एवढाच मुद्दा असता तर ती गोष्ट व्यक्तिगत झाली असती. पण समुदायांतील अनेक लोकांनीं उठून एकदम बोलूं लागावें हें दृश्य दुःखप्रद होतें. झालेली गोष्ट क्षणिक होती असें मला वाटलें असतें, तर मीं त्याची खास चिंता केली नसती. पण तशी ती एक आकस्मिक गोष्ट नव्हती. तो एक आपल्यांतील दुर्गुण च आहे. ह्याला मी असहिष्णुता म्हणतों. आणि धीरेन्द्र भाईनीं तसें म्हटलें हि. पण ह्याहून अधिक खोल दोष ह्यांत आहे.

**नम्र बना.**

एकीकडे आम्ही स्वतःला पुण्यात्मे समजतों, सर्वोदयाची भावना राखणारे 'सर्वोदय-सेवक' समजतों. इतकेंच नाहीं तर कांहीं लोक आपल्या पत्रावर स्वतःचा सेवक नंबर लिहून ठेवतात. एका मित्राचें पत्र आलें त्यांत वर 'सर्वोदय-नंबर' आणि खालीं 'सर्वोदय-सेवक' असें छापलें होतें, ही गोष्ट निर्दोष हि असूं शकेल. पण मला जो अनुभव आला त्यावरून माझ्या लक्षांत आलें आहे कीं सर्वोदय सेवक बनणें किंवा सर्वोदयाची विचारसरणी मानणें —मग त्याप्रमाणें आमचें आचरण असो अथवा नसो— हें च जणूं एक मोठें पुण्यकार्य आम्ही करीत आहोंत आणि त्यामुळें आम्ही कांहींसे इतराहून श्रेष्ठ आहोंत अशी भावना आमच्या पैकीं कांहीं मंडळींच्या मनांत असण्याची शक्यता आहे. अशी जर आत्मवंचना आम्ही करून घेऊं तर ती आम्हांला घातक ठरणारी आहे. आम्ही अति नम्र बनलें पाहिजे. आम्ही सेवक आहोंत आणि सारी सृष्टि सेव्य आहे अशी भावना पाहिजे. सेवकाचें नातें नम्रतेचें असतें, ह्या उलट आपण जर स्वतःला उच्च विचार राखणारे मानूं तर एका काळीं ब्राह्मणांची जी गत झाली ती च आमची होईल. ब्राह्मण—ज्ञान परायण होते, पण त्यांना अभिमान झाला व स्वतःला ते उच्च मानूं लागले. हा एक दोष आहे. त्याचें शोधन करून अधिकांत अधिक नम्र होण्याचा आपण प्रयत्न करावा असें मी इच्छितों.

विचारांचें अध्ययन व चिंतन

या शिवाय आणखी हि कांहीं गोष्टी आहेत. त्यांना मी दोष न म्हणतां उणीवा म्हणतों. आम्ही पुष्कळसे बहिर्दृष्टीनें विचार करतों, खोलांत जात नाहीं; विचारांचें अध्ययन करीत नाहीं. माझा हा आक्षेप अनेक वर्षांपासून आहे. आमचे जे कार्यकर्ते रात्रंदिवस कामांत गढलेले आहेत ते हि विचारांचें अध्ययन करीत नाहींत असें मीं पाहिलें आहे. मी शास्त्रीय अध्ययनाबद्दल बोलत नाहीं, पण जें काम आम्ही करतों, त्याच्या मुळाशीं कांहीं विचार आहेत व ते बरे च खोल आहेत. त्यांचें चिंतन व अध्ययन आम्ही केलें नाहीं तर शेवटीं आमच्या स्फूर्तीचा क्षय होईल, ती दिवसेंदिवस जीर्ण होत जाईल ह्या गोष्टीकडे कार्यकर्त्यांचें लक्ष फार कमी गेलेलें दिसतें. गांधीजी असतांना हि ही च स्थिति होती. मीं एकदां एका कार्यकर्त्याला विचारलें, "तुम्ही नुकता च गांधीजींनीं लिहिलेला लेख वाचला आहे काय?" ते म्हणाले "नाहीं." मीं म्हटलें, 'तो वाचण्यालायक होता,' त्यावर त्यांनी उत्तर दिलें, "गांधीजी जे लिहितात ते वाचण्यालायक असणार च, पण आम्ही त्यांचें च काम करीत आहोंत व काम करणें हें च तर त्यांच्या लिखाणाचें सार आहे. आमच्या कामांतून त्यांनीं लिहिलेलें वाचण्याइतकी फुरसत मिळत नसल्यामुळें आम्ही तें वाचूं शकत नाहीं." मीं म्हटलें, "जर कार्यकर्त्यांना वाचण्याची जरूर नसेल तर गांधीजींना लिहिण्याची तरी काय जरूर होती? गांधीजी स्वत: कर्मपरायण असून हि जर दर आठवड्यास कांहींना कांहीं तरी लिहीत राहतात, तर त्यांत कांहीं नवीन गोष्ट, कांहीं नवीन प्रकाश आपणांस मिळण्याचा संभव आहे असें आपण समजलें पाहिजे. आणि म्हणून आपण तें वाचलें पाहिजे." कांहीं जण तर गांधीजींचाच आधार देतात. गांधी जींनीं मधून मधून म्हटलें हि आहे कीं, 'लोक उगीचच वाचत फार बसतात. त्यांनीं कामाला लागले पाहिजे.' जे लोक निष्कारण वाचीत राहतात आणि निःसार चिंतन करीत बसतात, त्यांना उद्देशून गांधीजींचें हें म्हणणें आहे. वस्तुत: जे कार्य करणारे

आहेत ते च खरोखर ज्ञानाचे अधिकारी आहेत. जे काम करीत नाहींत ते ज्ञान–प्राप्तीचे अधिकारी नाहींत. ज्ञानप्राप्तीचा ज्यांना अधिकार नाहीं त्यांनीं ज्ञानाची चर्चा करावी व जे ज्ञानप्राप्तीचे अधिकारी आहेत, त्यांनीं कर्म परायणतेच्या सबबीवर ज्ञानावरचा आपला हक्क सोडावा व त्याची कदर करूं नये, यानें च कर्म निस्तेज बनतें. हा अनुभव मला हि आला आहे गेलीं दोन वर्षें मी सारखा बोलत व लिहीत आलों आहे, पण जी गोष्ट मीं पन्नासदां सांगितली असेल ती सुद्धां पुनः पुनः सांगावी लागते. मी तसें करण्यास थकत नाहीं, कारण माझा त्यांत जप होतो, ही गोष्ट वेगळी.

## भक्तिमार्गी लोकांपेक्षां चिंतनाची आपल्याला अधिक गरज

वस्तुस्थिति अशी आहे कीं एखाद्या भक्तिमार्गी मनुष्याला चिंतनाची जितकी आवश्यकता असेल त्यापेक्षां आम्हांला ती अधिक आहे. कारण भक्तिमार्गी मनुष्य आपली व्यक्तिगत शुध्दि करून संतोष मानणारा असतो व त्या शुद्धिद्वारा जी दुनियेची सेवा होईल ती होईल असें मानणारा असतो. आमचें समाधान तेवढ्यानें होत नाहीं. व्यक्तिगत शुध्दि आमच्या सेवेच्या द्वारें च आम्ही करूं इच्छितों. अशा प्रकारें आमची बाह्य सेवा व आंतरिक चित्तशुध्दीची वृत्ति या दोन्ही गोष्टी एकरूप मानीत असल्यामुळें आमच्यावर अधिक खोलांत जाऊन चिंतन करण्याची फार जबाबदारी येते. कोणी भक्तिमार्गी पुरुष असा दावा करीत नव्हता कीं माझ्या विचाराचा प्रभाव जर आजूबाजूस पडत नसेल तर माझ्यांत च कांहीं अपूर्णता आहे; व त्यासाठीं मला प्रायश्चित इत्यादि केलें पाहिजे. ते असें मानत होते कीं आसपासच्या लोकांचें त्यांचें आपलें स्वतंत्र कर्म असतें, व म्हणून त्यांच्या चित्तशुध्दीची जबाबदारी आमच्यावर नाहीं; परस्परांचा परस्परांवर जो सहज परिणाम होणार असेल ते होईल असे भक्तिमार्गी समजत परंतु आम्ही व्यक्ति आणि समाज ह्यांत असा फरक करीत नाहीं व सभोंवारच्या वातावरणावर व परिस्थितीवर

५१ वा. क्र. ८१८५

होणाऱ्या परिणामावरून आमच्या चित्त-शुद्धीची कसोटी करतों. आम्ही जर खरेखुरे सत्यवादी व सत्यनिष्ठ असूं तर आसपासच्या लोकांत निर्भयता आणि सत्यनिष्ठा आली पाहिजे अशी आम्ही अपेक्षा राखतों. आमच्यापासून लोकांनीं एखादी गोष्ट लपवावी असें होतां कामा नये. आपल्या आसपासचा माणूस आपल्यापासून एखादी गोष्ट लपवीत असेल तर आपल्या सत्योपासनेंत व सत्यनिष्ठेंत कांहीं तरी उणीव असली पाहिजे असें आम्ही मानतों. म्हणून सभोंवारच्या वातावरणावरून आपल्या चित्तवृत्तीची कसोटी होते असें मानणाऱ्या लोकांवर पुष्कळ खोलांत जाण्याची जबाबदारी येते.

## अहल्या-राम-न्याय

एक दिवस बापू म्हणत होते, "माझ्यांत सत्याचा फार उणेपणा आहे." त्याचें कारण सांगतांना ते म्हणाले कीं 'अमुक मनुष्य इतके दिवस माझ्याजवळ राहिला, पण अमुक गोष्ट त्यानें माझ्याजवळून लपवून ठेवली. माझ्यासमोर सांगण्याची त्याची हिंमत झाली नाहीं. दुनियेंत जाऊन त्यानें सांगितली, पण माझ्याजवळ ती प्रगट केली नाहीं. मी जर सत्यनिष्ठ असतों, तर प्रथम मला सांगण्याची इच्छा त्याला झाली असती. दुसऱ्यांना ती सांगण्यास त्याला संकोच वाटला असता. मुलगा ज्याप्रमाणें आपल्या आईजवळ आपल्या हातून जें कांहीं पाप किंवा दोष घडला असेल तो सांगतो, तसा त्यानें येऊन मला सांगितला असता. पण झालें उलट. दुनियेंत मित्राजवळ तो बोलला, पण इतकीं वर्षें होऊन गेली तरी मजजवळ कांहीं बोलला नाहीं. त्याचा अर्थ च हा कीं माझ्यांत सत्य नाहीं. जर असतें तर समोरच्याला सत्य बोलण्याची हिंमत झाली असती. माझ्याजवळ राहणाऱ्यास जर असें धैर्य आलें नसेल तर तो माझ्या सत्यनिष्ठेचा कमीपणा आहे." मी सर्व ऐकून घेत होतों. पुष्कळ चर्चा हि झाली, ती मी येथें सांगत बसत नाहीं. पण बापूंनी जी दृष्टि ठेवली त्यांत पूर्ण सत्य नसलें तरी सत्याचा एक अंश आहे.

ह्याची दुसरी बाजू हि आहे व ती मीं बापूंना थोडक्यांत सांगितली. ती अशी कीं मनुष्याची वृत्ति आणि आजूबाजूची परिस्थिति ह्यांचा जो परस्परांवर परिणाम होतो तो अहल्या-राम-न्यायानें होत असतो. मीं हा एक नवीन न्याय बनविला आहे. या न्यायाचा भावार्थ असा, रामचन्द्र प्रवास करीत असतां एका आश्रमांत आले व तेथें एका दगडाला त्यांचा पायाचा स्पर्श होऊन त्यांचा उद्धार झाला व त्यांतून अहल्या प्रगट झाली; अशी रामायणांत कहाणी आहे, आतां हा महिमा कोणाचा ? रामचन्द्राचा कीं अहल्येचा ? रामचन्द्राचा म्हणावा तर लाखों दगडांना रामाच्या पायाचा स्पर्श झाला पण त्यांतून एक हि अहल्या निघाली नाहीं. म्हणजे केवळ रामाच्या चरण-स्पर्शाचा हा महिमा नव्हे. बरें, ज्या दगडांत अहल्या सुप्त पडली होती त्या दगडाचा हा गुण म्हणावा तर त्याला लाखों लोकांचे पाय लागले, पण त्याचा उद्धार झाला नाहीं. रामाच्या चरण स्पर्शानें च त्याचा उद्धार झाला, म्हणजे अहल्येचा हि हा महिमा नव्हे, याचा अर्थ असा कीं कांहीं गुण रामाचा व कांहीं गुण अहल्येचा. दोघांचे गुण एकत्र होऊन ही घटना घडलेली आहे. म्हणून एकाची च संपूर्ण जबाबदारी मानण्यानें पूर्ण न्याय होत नाहीं; व पूर्ण सत्य होत नाहीं.

### सत्यनिष्ठेचा व्यापक प्रभाव

तथापि आम्ही सत्यनिष्ठ असूं तर भोंवतालच्या वातावरणावर त्याचा परिणाम झाला पाहिजे, ही बापूंची अपेक्षा मिथ्या नाहीं. पण भक्तिमार्गी सत्पुरुष अशी अपेक्षा राखीत नाहींत. दुनिया ईश्वराच्या इच्छेने चालते, तेव्हां माझ्या स्पर्शानें वाघानें वाघपणा किंवा गाईनें गायपणा सोडला पाहिजे अशी अपेक्षा कां राखावी ? एका भक्तानें तर मला येथपर्यंत सागितलें कीं, ईश्वर असून हि जर दुनियेंत बदमाश राहूं शकतात तर माझ्या अस्तित्वांत जगांत बदमाश राहिले तर काय आश्चर्य ? ईश्वर सर्वत्र विराजमान असतांना

जर त्याच्या संगतीनें बदमाश सुधरत नाहींत तर मी ईश्वरापेक्षां कोण येवढा मोठा लागून राहिलों आहे कीं माझ्या संगतीनें ते सुधरावेत ! हा युक्तिवाद भक्तिमार्गाचा आहे. ह्यांत परम नम्रता आहे व अहंकाराचा पूर्ण अभाव आहे. व त्या दृष्टीनें त्यांत सत्याचा एक अंश आहे. पण सत्याग्रही या नात्यानें आम्ही असें मानतों कीं आमची चित्तवृत्ति शुद्ध असेल तर आसपासच्या वातावरणावर त्याचा परिणाम झाला पाहिजे. आमची सत्याग्रहाची योजना च ह्या सिध्दांतावर आधारलेली आहे. सत्याग्रही तत्त्वज्ञानांत हा मूलभूत विचार आहे, तो आम्ही मानत असूं तर आमच्यावर मोठी जबाबदारी येते.

## विचारांत खोल जाणें अपरिहार्य

जीवनाचा खोल विचार आम्हांला केला पाहिजे; व भक्तिमार्गी लोकांपेक्षां आपण जीवनांत अधिक खोल शिरलें पाहिजे. तें आज होत नाहीं, आणि हिन्दुस्थान ही अशी भूमि आहे कीं जिथें विचाराच्या खोलीपर्यंत पोहोंचल्या शिवाय आपला आचार टिकावयाचा नाहीं. आमच्या पुरतें बोलावयाचें तर तो टिकेल, कारण आम्ही आग्रहानें तो टिकवूं. पण तो हिन्दुस्थानांत रूढ होऊं शकणार नाहीं. कारण हिन्दुस्थान ही एक तत्वज्ञानाची भूमि आहे. इथल्या लोकांना प्रत्येक गोष्टीमागील विचारांत खोलवर जाण्याची संवय आहे. बुद्ध धर्मानें एक प्रयोग करून पाहिला. ते कांहीं आचारापर्यंत गेले, कांहीं सामाजिक सुधारणेपर्यंत गेले, परंतु तत्त्वज्ञानाचा खोलींत ते शिरले नाहींत. परिणाम असा झाला कीं, बुद्ध धर्माचा कल्याण-कारी स्पर्श हिंन्दु-स्थानला जो काय मिळायचा तो मिळाला, पण तो धर्म इथें टिकला नाहीं. कारण विचारांची खोली गांठून मूळ तत्त्वज्ञानांत बुद्ध धर्म शिरला नाहीं, असो; हा एक खोल विषय आहे. त्यांत मी इथें शिरूं इच्छीत नाहीं. जातां जातां उल्लेख केला इतकें च. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं ही भूमि च अशी आहे कीं जेथें खोल तत्त्वज्ञानांत गेल्याशिवाय जीवनाचा कोणता च

व्यवहार टिकूं शकत नाहीं, आपण गीतेंत पाहतो ना ! लढाईच्या निमित्तानें एक सरळ साधा प्रश्न उपस्थित झाला पण त्याचें निराकरण करतांना किती खोलांत ते गेले. क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचाराचें पृथक्करण झालें, प्रकृति-पुरुषाचा विचार झाला, आत्म-स्वरूपाचें वर्णन झालें. हजार गोष्टी त्यांत आल्या आणि या सर्वांची परिणति मोहनिवृत्तींत व कर्तव्याच्या ठिकाणीं बुद्धि स्थिर होण्यांत झाली. हिन्दुस्थानची भूमिका जर लक्षांत घेतली नाहीं तर एवढ्या साध्या प्रश्नावरून इतक्या खोल पाण्यांत जाण्याची काय जरूर होती तें समजायचें नाहीं. आम्ही खोल विचार करीत नाहीं हा आमच्यांत एक उणेपणा आहे. आमच्या हातून एक मोठें काम व्हावें अशी इच्छा असेल तर तो उणेपणा आपल्याला काढून टाकला पाहिजे.

## सर्वांगीण दृष्टि – सर्व सेवा

आतां ज्याचा उल्लेख मीं पहिल्या व्याख्यानात केला होता तो तिसरा दोष मी पुन्हां सांगतों. आमच्यांत शक्ति कमी नाहीं व लोकांची हि आमच्या विषयींची अपेक्षा मोठी आहे. पण आमचीं सर्व कामें अलग अलग होत आहेत, एकाला दुसऱ्याच्या कामाचा पत्तासुद्धां नाहीं; अशी स्थिति आहे. त्यामुळें कामाला प्रत्यक्ष असें रूप येत नाहीं. समजा कीं एखाद्या जवळ तेलाच्या बाटल्यांचा ढीग जमला आहे, दुसऱ्याजवळ आगपेट्यांचीं डझनें पडलीं आहेत व तिसऱ्या-जवळ बरेचसे कंदिल पडले आहेत, पण ह्या सर्वांचा जोंपर्यंत एकत्र योग घडत नाहीं तोंपर्यंत प्रकाश पडायचा नाहीं; अंधार कायम राहील. तसें च आमचें होत आहे. कताई मंडळें स्थापन होतात. लोक बिचारे आठवड्यात एक दिवस एकत्र जमून कांततात, थोडें काम करून घरोघर निघून जातात. त्यांचा जगांत कांहीं च प्रचार होत नाहीं. पन्नास मंडळें स्थापन झालीं, त्यांतलीं पंचवीस बंद झालीं, बाकीचीं पंचवीस कांहीं काम करतात, पण त्यांचा इतरांना कांहीं पत्ता नसतो. कताई मंडळें कोठें कोठें स्थापन झालीं

20243 वि: 90368 नों: दि:

तें जाणण्याची ग्रामोद्योग संघाला फिकीर नाहीं. त्यांची आठवण येते. पण तीं चालली न चालली हें पाहण्याची जबाबदारी त्यांच्यावर नाहीं. इकडे ग्रामोद्योगाचें काम नीट चालत नसेल तर त्या बाबतींत जागरूक राहण्याची जबाबदारी चरखा संघावर नाहीं. असें सगळें आमचें चाललें आहे; तें चूक आहे. यांतून शक्ति निर्माण होत नाहीं हें सर्व जाणतात. तरी पण चार पांच वर्षें हें असें च चाललें आहे. पण आतां आपण एक मोठें काम हातीं घेत आहोंत आणि त्यांत शक्ति केन्द्रित केल्या खेरीज तें पुरें होणारें नाहीं म्हणून या विषयाकडे मंडळींचें ध्यान खेंचावें असें मला वाटलें. जयप्रकाशजींनीं हि या गोष्टीचा उल्लेख केला. ते म्हणाले, हे सगळे संघ अलग अलग राहिल्यानें शक्ति निर्माण होत नाहीं, सर्व मिळून एक संघ झाला तर चांगलें होईल. एक सुहृद आणि मित्र ह्या नात्यानें त्यांनीं आपल्याला ही सूचना केली आहे. आणि मला सांगण्यांत आनंद वाटतो कीं या गोष्टीचा गंभीरपणें विचार चालू आहे. सर्व सेवा संघ एकरूप बनेल व त्यांत जे मुख्य मुख्य संघ आहेत ते विलीन होतील. ह्या बाबतींत अंतिम निर्णय होईल तो लोकांसमोर येईल च, माझ्यामतें हा दोष छोट्या कार्यकर्त्यांचा नसून मुख्य कार्यकर्त्यांचा आहे. त्यांनीं जो मार्ग आखून दिला त्याप्रमाणें बिचारे छोटे लोक वागताहेत. अशी च जर पद्धति ठेवली असती कीं जेथें म्हणून काम सुरू करावयाचें तिथें तें सर्व सेवा संघाच्या नांवानें व सर्वांगीण दृष्टीनें च चालायचें तर ती सर्व-सेवा झाली असती. म्हणून केवळ कताई मंडळ स्थापन न होतां सर्व-सेवा केन्द्र स्थापन व्हावें. त्यांत कताई, ग्रामोद्योग, नईतालीम, हरिजन सेवा इत्यादि सर्व चालावें. या केंद्रांत एखाद्या कामावर अधिक भर दिला जाईल तर एखाद्यावर कमी दिला जाईल. त्या त्या ठिकाणचा जो कार्यकर्ता असेल त्याची शक्ति, वृत्ति, स्थानिक परिस्थिति आणि गरज यावर तें अवलंबून राहील, पण जें केन्द्र उघडलें जाईल तें सर्वसेवेचे च केन्द्र असेल, या प्रमाणें विचार चालू आहे, त्यामुळें अलगपणाचा दोष निघून

जाईल असें मला वाटतें. तरी पण ह्या कडे कार्यकर्त्यांचें लक्ष वेधावें व त्यांनीं सर्वांगीण दृष्टि ठेवून मिळून मिसळून काम करावें असें वाटल्यावरून ही गोष्ट येथें सांगितली. असें जर न झालें तर आज दिसत असलेलें काम थोडे दिवस चालेल आणि पुढें सर्वच्या सर्व च बंद पडेल.

## अंतःकरण पूर्वक ईश्वरावर भरंवसा.

आतां शेंवटची एक गोष्ट. पुष्कळ निरीक्षणांतीं मी अशा निर्णयावर आलों आहे कीं आम्ही सकाळ-संध्याकाळ जी प्रार्थना करतों ती खोल नसते. पुष्कळशा संस्थांत सदाचार किंवा शिष्टाचार म्हणून ती चाललेली आहे. सदाचार चांगली वस्तु आहे पण केवळ सदाचार म्हणून प्रार्थना चालली तर कळकळीनें केलेल्या प्रार्थनेनें जो अनुभव येतो तो तींत येणार नाहीं. ह्या बाबतींत बापूंनी आपल्या जीवनानें व मरणानें आम्हांला पुष्कळ शिक्षण दिलें आहे. ते गेले तेव्हां प्रार्थनेच्या उत्साहांत व प्रार्थनामय होऊन देहत्याग करून गेले. अंगाला गोळीचा स्पर्श होतां च त्यांनीं ईश्वराचें नांव घेतलें ही गोष्ट कांहीं लहान नव्हे. बापू निरंतर जागृत असत, दोन वेळची प्रार्थना हा त्यांचा केवळ सदाचार नव्हता, तर आपलें हृदय त्यांत ते ओतीत असत. ते म्हणत कीं दर श्वासागणिक माझी प्रार्थना चालू असते. हें त्यांचें म्हणणें काल्पनिक किंवा अलंकारिक नव्हतें, तर त्यांच्या जीवनाची ती मुख्य वस्तु होती. आम्ही जी प्रार्थना करतों ती शिष्टाचार असला तरी ती वरवरची असते. आतां असें पहा, इथें आम्ही भोजनासाठीं केवढी व्यवस्था केली ! सर्व तालिमी संघ, आशादेवी, बिहारचे सारे लोक, ह्या कामीं लागले तेव्हां आम्हांला जेवण मिळालें. भोजनासाठीं एवढें मोठें आयोजन केलें, पण प्रार्थनेसाठीं आम्ही काय आयोजन केलें असेल ? किती चिंतन केलें असेल ! आम्ही प्रार्थना तर केली पण ती प्रीत्यर्थ आम्हांला फारसें कांहीं करावें लागलें नाहीं. आतां प्रार्थना वस्तु च अशी आहे कीं त्यासाठीं खास बाह्य फारसें

करावें लागत नाहीं, जें करावें लागतें तें आंतरिक असतें व तें हि एका क्षणांत होतें. त्यासाठीं अधिक वेळ हि द्यावा लागत नाहीं. एवढें आम्ही करूं तर आम्हांला बळ मिळेल. आम्ही जसजशीं एकेक कठिण कामें हातीं घेऊं तसतशीं तीं पूर्ण करण्यासाठीं एका परमेश्वराच्या आधाराशिवाय दुसरी एखादी शक्ति आमच्याजवळ असल्याचें मला दिसत नाहीं. ईश्वराचा आधार हृदयपूर्वक जर आपण घेतला नाहीं तर सत्यादि धर्मांवर आपण अविचल राहूं शकणार नाहीं.

## नीति-धर्माचें अविचल पालन.

शंकररावजी काल म्हणाले कीं आम्ही जीं कामें करतों तीं इहलोकासाठीं म्हणजे साक्षात् येथें त्यांचा अनुभव घेण्यासाठीं करतों. जुन्याकाळीं यात्रा किंवा यज्ञ होत त्यांत परलोकाकडे दृष्टि असे, हा आमच्या व त्यांच्या कामांत फरक आहे. हा फरक तर त्यांनीं ठीक दाखविला, पण परलोकाचें नांव कां घेतलें जातें हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तें एवढ्यासाठीं घेतलें जातें कीं, एखाद्या व्यक्तीला आपण जेव्हां म्हणतों कीं "तूं सत्यावर अविचल रहा, त्यांत तुझें नुकसान नाहीं, उलट फायदा आहे." तेव्हां तो उत्तर देतो कीं "अमुक प्रसंगीं मी खरें बोललों तर माझा नाश होईल व खोटें बोललों तर मी वांचेन" ह्याला तुम्ही काय उत्तर द्याल ? अशा प्रसंगीं हि असत्य बोलतां कामा नये, अशा अविचल सत्यनिष्ठेवर, आणि आत्मनिष्ठेवर ज्यांचा विश्वास आहे, ते त्या बिश्वासाला आधार कोणता दाखवतील ? ज्यांनीं ह्या गोष्टीचा बिचार एका वेगळ्या दृष्टीनें केला त्यांनीं परलोकाचा आधार दाखविला व म्हटलें कीं, "येथें तुझा फायदा होतोसा दिसेल पण परलोकांत नुकसान च होईल, परलोक स्थायी आहे तर इहलोक थोड्या दिवसांचा आहे. थोड्या दिवसांच्या लाभाकडे नजर ठेवून स्थायी लाभ सोडणें योग्य नाहीं." ती एक बालभाषा होती. बालभाषा म्हणजे अविकसित भाषा. विकसित भाषेंत

दा. क्र. (१८६५)



बोलावयाचें तर असत्य बोलल्यास अंतःसमाधान राहत नाहीं असें म्हणावें लागेल, पण अंतःसमाधानाची कल्पना समजणें किंवा समजावणें जेथें कठिण जातें तेथें परलोकाची म्हणजे मृत्यूनंतरच्या जीवनाची भाषा वापरली जाते. सारांश, अंतःसमाधानाचा आधार घ्या किंवा परलोकांतील जीवनाची भाषा वापरा, कोणत्या हि परिस्थितींत सत्यादि नीतिधर्मावर अविचल राहावयाचें आहे ही मुख्य गोष्ट आहे. त्याच्या सिध्दीसाठी प्रेरणा मिळविण्यास म्हणून परलोकाचें, आत्मकल्याणाचें किंवा अंतःसमाधानाचें नांव घेतां येईल. ज्याची जितकी विकसित भूमिका झाली असेल त्या प्रमाणें तो सत्याचें आचरण करील. मला मात्र असें च वाटतें कीं सत्यादि नीतिधर्माच्या अविचल पालनासाठीं अंतः-समाधानाहून अधिक चांगली कोणती हि प्रेरणा असूं शकत नाहीं, पण ज्यांनी परलोकाचा आधार घेतला त्यांनी कांहीं चूक केलेली नाहीं, कारण त्यांचा हेतु सत्यनिष्ठा अविचल राहावी हा च होता. हें मी सहज प्रासंगिक सांगितलें. मला सांगावयाचें हें आहे कीं, जर आम्ही आमच्या धर्मावर अविचल राहूं इच्छीत असूं, आणि जगांत केवढें हि हंसें झालें तरी त्याला सोडूं इच्छीत नसूं तर त्यासाठीं खोल आधाराची आवश्यकता आहे. ह्या कामीं ईश्वर-प्रार्थना जशी आम्हांस उपयोगी पडेल तशी दुसरी कोणती हि वस्तु उपयोगी पडणार नाहीं, म्हणून आमच्या सर्व कामांचा आधार आम्ही ईश्वर-निष्ठा ठेवावा आणि आम्ही जी प्रार्थना करतों त्यांत अधिक प्राण ओतावा, असें माझें सांगणें आहे.

आतां एक च गोष्ट. पुढल्या वर्षी आम्हांला जें काम करावयाचें आहे त्यासाठीं कमीतकमी पुरें एक वर्ष देणारे लोक पाहिजेत. ज्या लोकांची तयारी असेल त्यांनीं आपलें नांव सर्व सेवा संघाला द्यावें म्हणजे त्यांना महिना दोन महिने शिक्षण देण्याची व्यवस्था करतां येईल व त्यांच्या सेवेचा उपयोग केला जाईल. म्हणून ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आपलीं नांवें द्यावीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २०२५४३ वि. निबंध

| | लेखक | रु. आ. |
| --- | --- | --- |
| ४ तेरा दिवस | विनोबा | ०-८ |
| वेडछी आश्रमांत | ,, | ०-८ |
| अभंग-व्रतें | ,, | ०-६ |
| मूल उद्योग-कांतणें | ,, | ०-१२ |
| विचार-पोथी | ,, | १-८ |
| सर्वोदय यात्रा ( हिंदी ) | ,, | १-४ |
| ..नेश्वरी शब्दार्थ कोष | शिवाजी भावे | २५-० |
| ..मालयाची हांक | कुंदर दिवाण | २-० |
| महंमदाचीं वचनें | ,, | १-० |
| ..पद | ,, | ०-१२ |
| ..ाग्रह व स्वराज्य | अप्पासाहेब पटवर्धन | ३-० |
| ..धीजींचीं पत्रें | ,, | ०-१० |
| ..गाल प्रभात | ,, | ०-५ |
| ..थायी समाज-व्यवस्था | कुमारप्पा | २-८ |
| आश्रम-संगीत | संकलक कुंदर दिवाण | १-० |
| विनोबा-विचार-दर्शन | यदुनाथ थत्ते | ३-० |
| आश्रम-पाठ | | अडीच आणे |
| भगवद्-गीता | | ०-४ |
| थोरोचें श्रमजीवन | अनुवादक—वा. ज. कुंटे | १-० |

REFBK-0008186

★

## आमचीं प्रकाशनें मिळण्याचीं ठिकाणें

१ ग्रामसेवा मंडळ गोपुरी, पो. नालवाडी, वर्धा.
२ स्वराज्य भांडार राठी मार्केट, वर्धा.
३ खादी भांडार बच्छराज रोड; वर्धा.
४ डॉ. रा. ना. दातार, ३४६ सदाशिव पुणें २.

★